# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद

ऑगस्ट २०२४ | आवृत्ती-१४

# क्रांतिनायक





**शताब्दी महोत्सव समारोप समारोह विशेषांक**

विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

ऑगस्ट २०२४ | आवृत्ती-१४

मार्गदर्शक
**डॉ. प्रशान्त बोकारे**
प्रभारी कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. सी. पी. राधाकृष्णन**



मा. प्रभारी कुलगुरु
**डॉ. प्रशान्त बोकारे**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**




# शिक्षण म्हणजे भविष्य - पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर
# जगात नसेल असे संशोधन विद्यापीठाने करावे - श्री नितीन गडकरी
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शताब्दी महोत्सव समापन समारोह

शिक्षण म्हणजे भविष्य आहे. विद्यापीठाने शिक्षण देत विद्यार्थी घडविले, तर विद्यार्थ्यांनी देशाचे भविष्य घडविले, असे प्रतिपादन जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले. जगात नसेल असे संशोधन विद्यापीठाने करावे, असे आवाहन केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १०१ वा वर्धापन दिन आणि शताब्दी महोत्सव समापन समारोह सिव्हिल लाईन येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात रविवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. यावेळी ते मार्गदर्शन करीत होते. या समारंभात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार, आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार, आदर्श अधिकारी पुरस्कार, आदर्श कर्मचारी पुरस्कार, प्राचार्य बलराज अहेर स्मृती सुवर्णपदक, उत्कृष्ट विद्यार्थी आदी पुरस्कार अतिथींच्या हस्ते वितरित करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, विशेष अतिथी म्हणून मा. केंद्रीय मंत्री परिवहन व महामार्ग विभाग भारत सरकार श्री. नितीन गडकरी, माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ राजू हिवसे यांची उपस्थिती होती. १०० वर्षे पूर्ण करणारे अद्‌भुत असे विद्यापीठ असून शास्त्रज्ञ, राजकारणी, कलावंत, न्यायाधीश, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ता, प्रशासक असे भारताचे नेतृत्व करणारे उत्कृष्ट नेते विद्यापीठाने दिले असल्याचे डॉ. माशेलकर पुढे बोलताना म्हणाले. विद्यापीठाचा गेलेला काळ हा दैदिप्यमान इतिहास झाला. मात्र, भविष्य काय? असे बोलत भविष्यातील भारत घडविणारे शिक्षण असावे, असे ते म्हणाले. विकसित भारत कसा असावा याची सप्तसूत्री त्यांनी त्यांच्या भाषणातून सांगितली. विकसित भारत हा शाश्वत विकासाचा, सुसंस्कृत, सुविद्य, सुशासित, स्वानंदी, सुरक्षित व स्वावलंबी असावा असे डॉ. माशेलकर म्हणाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संदेशाचे आकलन करताना महाराजांना सर्व समावेशक ज्ञानाधिष्ठित समाज हवा होता, समाजातील सर्व घटकांचा उद्धार व्हावा, वर्गरहित समाज असावा म्हणून त्यांनी सामुदायिक प्रार्थना सुरू केली. गावाचा विकास व्हावा म्हणून ग्रामोन्नतीचा संदेश दिला. एकंदरीत भारत कसा असावा असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मांडले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी रंगविलेले चित्र पुढे नेल्यास भारत विकसित होईल, असे डॉ. माशेलकर म्हणाले. ज्ञान, कौशल्य, विचार, व्यक्तिमत्व, समता, नेतृत्व संवर्धन, मूल्यसंवर्धन निर्माण करणारे शिक्षण हवे आहे. एकूणच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराप्रमाणे मानवाला चांगला मनुष्य बनविणारे शिक्षण आज हवे आहे. ज्ञानेश्वरांची प्रेरणा हवीच असून आता विज्ञानेश्वराकडे वळले पाहिजे. सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र आल्यास ज्ञानातून संपत्ती निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गत पाच वर्षात २१ हजार नवीन स्टार्टअप सुरू झाले. शिक्षणातून ज्ञान, ज्ञानातून संशोधन, संशोधनातून नाविन्यता, नाविन्यतून उद्योजकता असा शिक्षणाचा आयाम हवा आहे. तरच ज्ञानाचे संपत्तीत परिवर्तन होईल असे ते म्हणाले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि चॅट जीपीटी याची मदत कशी घ्यावी याचे कौशल्य शिक्षकांनी अवगत केले पाहिजे. विज्ञान शक्तिमान आहे. याकडे लक्ष केंद्रित करा, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांनी नवीन दिशा शोधत २०४७ पर्यंत भारताला विकसित करावे असे ते म्हणाले. पद्मविभूषण पुरस्कार स्वीकारत असतानाचे अनुभव त्यांनी त्यांच्या भाषणात विशद केले.




## जगात नसेल असे संशोधन विद्यापीठाने करावे - श्री नितीन गडकरी

जगात नसेल असे संशोधन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने करावे, असे प्रतिपादन केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांनी केले. विद्यापीठाने मागील शंभर वर्षाचे मूल्यांकन करताना १०० टक्के अनेक उत्तम विद्यार्थी निर्मिती निर्माण केले आहे. मात्र, भविष्यात नदीच्या प्रवाहाप्रमाणे न वाहता गरजेनुसार क्षेत्रनिहाय संशोधन करावे. समाजाच्या गरजा ओळखून त्याचे समाधान शोधण्याचा प्रयत्न करावा. विद्यापीठातील प्रत्येक विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीच्या आधारे आगामी २५ वर्षाकरिता भविष्यकालीन योजना तयार करावी. येथील उद्योगाला आवश्यक असणारे अभ्यासक्रम तयार करावे. सोबतच विद्यार्थ्यांना मूल्यदिस्तीत जीवन पद्धतीची शिकवण विद्यापीठाने द्यावी अशी ते म्हणाले. सोबतच आगामी काळात विद्यापीठ परिसरात ५ हजार वृक्ष लागवड करण्याचे आवाहन त्यांनी केले.




## विद्यापीठाचा ऋणी राहील- डॉ. चारुदत्त मायी

पन्नास वर्षांपूर्वी ज्या विद्यापीठातून पदवीधर झालो, जेथे जडणघडण झाली. त्याच विद्यापीठाने जीवनसाधना पुरस्कार देत सन्मान करावा याचा सर्वोच्च आनंद असून विद्यापीठाचा ऋणी राहील असे मनोगत डॉ. चारुदत्त मायी यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केले. बासमती तांदूळ याचा पेटंट मिळविताना डॉ. माशेलकर यांच्यासोबत कशाप्रकारे प्रयत्न केले याची माहिती त्यांनी दिली. या पुरस्कारातून बळ मिळेल असे सांगत विदर्भातील शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये, यासाठी नवीन प्रकल्पावर कार्य करीत असून पुरस्काराने स्फूर्ती मिळेल असे ते म्हणाले.




## चारित्र्यवान विद्यार्थी निर्माण करावे - डॉ. प्रशान्त बोकारे

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाचा समारोप होत असताना समाज तसेच नागपूरच्या दृष्टीने हे अभिमानास्पद आहे. १०० वर्षे जुने विद्यापीठ असल्याने शिक्षकांची जबाबदारी आता वाढली आहे. शिक्षकांनी चारित्र्यवान विद्यार्थी निर्माण करावे असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी अध्यक्षीय भाषण करताना केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी शताब्दी महोत्सव वर्षाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची विविध योजनांची माहिती दिली. राष्ट्रीय तसेच राज्य स्तरावरील विविध कार्यक्रमांचे आयोजन यादरम्यान करण्यात आल्याचे सांगत कार्यक्रमाला उपस्थित सर्वांचे स्वागत त्यांनी केले. जीवनसाधना पुरस्कार प्राप्त डॉ. चारुदत्त मायी यांच्या मानपत्राचे वाचन मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी केले. कार्यक्रमाला उपस्थितांमध्ये माजी कुलगुरू डॉ. कमल सिंह, माजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, श्री वामन तुर्के, श्री. अजय चव्हाण, गुरुकुंज मोझरी येथील श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस श्री जनार्दनपंत बोथे गुरुजी, अधिसभा सदस्य दिनेश शेराम, डॉ. किशोर इंगळे, डॉ. निरज जावडे, प्रथमेश फुलेकर, लिटूचे संचालक डॉ. राजू मानकर, गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, माजी कुलसचिव डॉ. पुरणचंद्र मेश्राम यांच्यासह अधिष्ठाता, विविध प्राधिकारणी सदस्य, विभाग प्रमुख, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमात बिंझानी विद्यालयातील विद्यार्थिनींनी दीपश्री पाटील यांच्या नेतृत्वात राष्ट्रगीत, राज्यगीत व विद्यापीठ गीत सादर केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंद्रूरकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.

## आदर्श संस्था-अधिकारी -कर्मचारी पुरस्कार

जीवन साधना पुरस्कार डॉ. चारुदत्त दिगंबरराव मायी, आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार काटोल तालुक्यातील शिक्षण प्रसारक मंडळ काटोल, प्राचार्य डॉ. बलराज अहेर स्मृती सुवर्णपदक परीक्षा विभागातील सामान्य चौकशी परीक्षा विभागाच्या अधीक्षक श्रीमती संगीता आत्राम, आदर्श अधिकारी पुरस्कार (विद्यापीठ) विद्याशाखा विभागातील अधीक्षक श्री संजय रामरावजी भोयर, आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार वर्ग ३ (विद्यापीठ) वित्त व लेखा विभागातील उच्चश्रेणी लिपिक श्री मंगेश नामदेवराव उताणे, आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार वर्ग ४ (विद्यापीठ) गृहविज्ञान विभागातील चपराशी दिलीप पांडुरंग लंगडे, कुलसचिव कार्यालयातील फर्रास श्री दुर्गेशसिंग केवलसिंग बैस, आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार (संलग्नित महाविद्यालय) वर्ग ३ मातृसेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क येथील वरिष्ठ लिपिक श्री संदीप मनोहर कोठार आणि वर्ग ४ हिस्लॉप महाविद्यालय येथील शिपाई श्री युवराज सज्जन गजघाटे यांना वितरित करण्यात आले.

## आदर्श विद्यार्थी पुरस्कार

आदर्श विद्यार्थी पुरस्कार विद्यापीठ ललित कला विभागातील नितीन विनोद मरसकोल्हे, आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार विद्यापीठ सांख्यिकी विभागातील विद्यार्थिनी आश्लेषा राजेश खंते, उत्कृष्ट सांस्कृतिकपटू (विद्यार्थी) पुरस्कार हिस्लॉप महाविद्यालयातील ब्रायन बेनहूर डोंगरदिवे, उत्कृष्ट सांस्कृतिकपटू (विद्यार्थिनी) वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूर तेजस्विनी सुनील खोडतकर, उत्कृष्ट एनसीसी कॅडेट जी. एस. महाविद्यालय वर्धा येथील प्रथमेश शरदराव चौधरी व हिस्लॉप महाविद्यालय नागपूरची तन्नू सुमेश शर्मा, उत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक सिटी प्रीमियर कॉलेज नागपूरचा तेजस गोपाल सोनारे व एलईडी कॉलेज नागपूरची प्राची राजेंद्र बोडे यांना वितरित करण्यात आले.







# विद्यापीठाला गौरवशाली इतिहास- माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आजी-माजी शिक्षक -कर्मचारी स्नेहमेळावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा यासह विविध क्षेत्रात गौरवशाली इतिहास लाभला असल्याचे प्रतिपादन कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव समारोप समारोह निमित्त आजी-माजी शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी स्नेह मेळावा शुक्रवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. चांदे मार्गदर्शन करत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. अनेक वर्षानंतर जुन्या सहकाऱ्यांसोबत भेटण्याचा योग आला असून स्नेह मेळावा म्हणजे आनंद पर्वणी असल्याचे डॉ. चांदे पुढे बोलताना म्हणाले. विद्यापीठाने स्वातंत्र्य लढ्यात योगदान दिले आहे. मॉरीस, हिस्लॉप कॉलेजचे विद्यार्थी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाल्याचा इतिहास असलेले असे मोठी गरिमा प्राप्त विद्यापीठ आहे. विद्यार्थी दशेत असताना येथील शिक्षक-प्रशासकीय कर्मचाऱ्यांना नेहमीच कर्तव्यनिष्ठ पाहिले आहे. त्यांच्या कर्तव्य निष्ठेमुळेच विद्यापीठाचे विद्यार्थी आज जगभर पसरले असल्याचे डॉ. चांदे म्हणाले. विद्यापीठापासून सागर, जबलपूर, अमरावती, गोंडवाना, एलआयटी, व्हीएनआयटी, अभियांत्रिकीत लोणारे विद्यापीठ, रामदेवबाबा अभिमत विद्यापीठ असे विविध विद्यापीठ वेगळे झाले असले तरी ४ लाख विद्यार्थी शिक्षण घेत असणे ही अभिमानास्पद असल्याचे ते म्हणाले. विद्यापीठामध्ये अधिष्ठाता म्हणून कार्यरत असताना त्यांच्या कार्यकाळातील अनेक जुन्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. विद्यापीठात प्रख्यात विद्वानांच्या व्याख्यानमाला व्हायच्या असे ते म्हणाले. शैक्षणिक क्षेत्रात विद्यापीठाने मोठी प्रगती केली असून जागतिक आव्हान पेलणारा विद्यापीठाचा डोलारा आहे. दोनवेळा सायन्स कॉंग्रेस होणे ही भाग्याची गोष्ट आहे. विद्यापीठाने मला घडविले असून माझ्यावर पूर्णपणे विद्यापीठाचे संस्कार असल्याचे ते म्हणाले. ३ वेळा अधिष्ठाता, एक्झिक्यूटिव्ह कमिटी सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्वत परिषदेचे सदस्य आदी विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली. अनेकांचे मार्गदर्शन मिळाले. २० वर्ष प्राध्यापक म्हणून तर २१ वर्ष कुलगुरू म्हणून कार्य, एआययू अध्यक्ष पदावर कार्य करण्याची संधी मला याच विद्यापीठामुळे मिळाली. शिक्षण पद्धतीत अनेकदा बदल झाला पूर्वी होणारे परिवर्तन दशकात होते. मात्र, आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि रोबोटमुळे दशकात नव्हे तर काही वर्षातच शैक्षणिक परिवर्तन होऊ शकते. जगाचा वेग खूप वाढला आहे. आगामी काळात मानवी जीवन व अंतरिक्ष विज्ञान यावर अधिक अभ्यास होईल. त्यामुळे या दृष्टीने विद्यापीठाने तयारी ठेवणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी शताब्दी महोत्सवाचा समारोप समारोह संस्मरणीय असून असे भाग्य देशातील फार कमी विद्यापीठाला लाभले असल्याचे सांगितले. स्थापनेनंतर सुरुवातीचे २५-३० वर्षे इंग्रजांच्या गुलामगिरीत तर देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे अशी विद्यापीठाची अतुलनीय कामगिरी आहे. येथून शिकून गेलेले विद्यार्थी काय करतात यावरून या विद्यापीठाचे विराटपण दिसून येते, असे कुलगुरू म्हणाले. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतल्याने उस्मानिया विद्यापीठाने काढलेल्या विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाने तत्कालीन कुलगुरू डॉ. केदार यांच्या विशेष प्रयत्नाने प्रवेश दिला. भारताचे माजी प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंहराव हे आपले माजी विद्यार्थी होते, हा विद्यापीठाचा इतिहास असल्याचे ते म्हणाले. विद्यापीठाची थोरवी, मोठेपण अवर्णनीय आहे. शिक्षक- प्रशासकीय कर्मचारी यांच्यामुळेच विद्यापीठाला हा दर्जा मिळाला असे प्रभारी कुलगुरू म्हणाले. मेळाव्यामध्ये उपस्थितांमध्ये माजी कुलगुरू डॉ. सिद्धार्थ विनायक काणे, माजी कुलगुरू डॉ. कमलसिंह, माजी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, माजी कुलसचिव डॉ. पुरणचंद्र मेश्राम, शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले, श्री सुभाष बेलसरे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला आजी- माजी शैक्षणिक विभाग प्रमुख, प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

















सांस्कृतिक समन्वयक श्री. प्रकाश शुक्ला यांच्या नेतृत्वात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, पश्चिम क्षेत्रीय युवा महोत्सव स्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. हिस्लॉप महाविद्यालयातील कामाक्षी हम्पीहोली हिने राष्ट्रीय युवा महोत्सव प्रथम परितोषिक, राष्ट्रीय युवा महोत्सव लुधीयाना येथे तिसरे पारितोषिक प्राप्त भरत् नाटयम्-(गणेश वंदना) सादर केले. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केलेले आकाश तायडे यांची लावणी, मथुरादास मोहता विज्ञान महाविद्यालयातील पश्चिम क्षेत्रीय युवा महोत्सवात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व व तृतीय पारितोषिक प्राप्त नृत्य, हिस्लॉप महविद्यालय - कोकणी लोकनृत्य (कुपारी), राष्ट्रीय युवा महोत्सव लुधियाना येथे प्रथम पुरस्कार प्राप्त व आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवाकरिता नामांकन असलेले क्या फरक पडता है। हे प्रहसन सादर करण्यात आले. कु. विपुस्वीनी खोडतकर व फैजान खान, वैश्नवी कुमलकर, सुरभी ऊबांळे यांनी सुंदर गीत सादर केले. यांच्यासह ललित कला विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी नृत्य, औषधी निर्माण शास्त्र विभागातील डॉ. निशिकांत राऊत, डॉ. दादासाहेब कोकरे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. धीरज कदम, श्री प्रमोद देशमुख, उद्यान अधीक्षक श्री प्रवीण गोतमारे, गांधी विचारधारा विभागप्रमुख श्री प्रमोद वाटकर, डॉ. अंजुषा पांडवकर, डॉ. अमित झपाटले, श्री मनोज मोरे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी सुंदर गीत सादर केले.












# जगातील नाविन्यपूर्ण संशोधनाचे विद्यापीठ व्हावे केंद्र
# केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

जगातील नाविन्यपूर्ण असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ केंद्र व्हावे असे प्रतिपादन भारत सरकारच्या परिवहन व महामार्ग विभागाचे केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव समारोप समारोह निमित्त सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृह येथे शनिवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी सकाळी माजी विद्यार्थी मेळावा पार पडला. माजी विद्यार्थी मेळाव्यात विशेष अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री श्री. गडकरी मार्गदर्शन करीत होते. प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते मेळाव्यामध्ये विविध क्षेत्रातील नामवंत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

माजी विद्यार्थी मेळाव्याचे अध्यक्षस्थान माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. विकास सिरपूरकर, मा. केंद्रीय मंत्री परिवहन व महामार्ग विभाग भारत सरकार श्री. नितीन गडकरी, प्रसिद्ध सिने अभिनेता डॉ. गिरीश ओक, माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे, पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ राजू हिवसे, माजी विद्यार्थी मेळावा समिती अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, समिती सचिव डॉ. कल्पना पांडे, विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. राजेश सिंह यांची उपस्थिती होती. विदर्भाची भूमी ही नैसर्गिक संसाधनांची खाण असून खनिजांपासून निर्मिती होणाऱ्या पदार्थ, उत्पादनांबाबत अभ्यासक्रम सुरू करीत विद्यापीठाला संशोधन केंद्र बनविण्याचे आवाहन केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांनी पुढे बोलताना केले. शारीरिक बळ खेळातून, सांस्कृतिक कलेतून सांस्कृतिक विकास तर विकास हा ज्ञानातून होतो. ज्ञान हीच शक्ती आहे. ज्ञानाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी काम केले पाहिजे. ज्ञान नसेल तर तंत्रज्ञानात पुढे जाता येणार नाही, जगात पुढे जायचे असेल तर नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रयत्न विद्यापीठाने केले पाहिजे. त्यामुळे विद्यापीठ ज्ञान शक्तीचे केंद्र बनावे, असे गडकरी म्हणाले. आपल्या क्षेत्रातील सामाजिक गरजांची पूर्तता करायची असेल तर सर्व क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान विद्यापीठातून निर्मित होणे गरजेचे आहे. सामाजिक गरजा विद्यापीठातून निर्मित झालेल्या तंत्रज्ञानातून पूर्ण होणे अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या जडणघडणीत शिक्षकांचा महत्वपूर्ण संबंध आहे. तत्त्वनिष्ठ शिक्षकांनी घडविल्यानेच आमचे जीवन समृद्ध झाले आहे. शिक्षकांमुळेच आम्ही घडू शकलो. सर्वांच्या जीवनात सुरुवातीच्या काळात मार्गदर्शकाची गरज असते, मार्गदर्शकाची भूमिका विद्यापीठाच्या शिक्षकांनी पूर्ण केल्याचे ते म्हणाले. यावेळी मार्गदर्शन करताना अनेक जुन्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. विधी महाविद्यालयात शिक्षण घेत असताना कायद्यात जसे लिहिले आहे तसे केलेच पाहिजे, अशी शिकवण मिळाली. ज्ञानासोबतच आत्मशक्तीची गरज असते. राष्ट्रसंत आणि संत गाडगेबाबा संतांच्या विचारातून ही आत्मशक्ती प्राप्त होते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना माजी विद्यार्थी समिती सचिव डॉ. कल्पना पांडे यांनी १०० वर्षात प्रथमच माजी विद्यार्थ्यांना बोलावले असल्याचे सांगितले. कार्यक्रमात २७ कुलगुरू सहभागी झाले असून त्यांचे स्वागत करून उपकृत करतो आहे, असे त्या म्हणाल्या. माजी विद्यार्थी म्हणून आपणास विद्यापीठाकडून काय अपेक्षित आहे. याबाबत त्यांनी माजी विद्यार्थ्यांना भविष्यकालीन कार्यक्रमाबाबत अवगत केले. स्वागतपर भाषण करताना माजी विद्यार्थी समितीचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी अनेक पिढ्यांनी विद्यापीठाचा नावलौकिक वाढवला असल्याचे सांगितले. शिक्षण क्षेत्र हे समाजात ताकतीचे क्षेत्र तसेच ऊर्जा क्षेत्र असल्याचे सांगितले. संपूर्ण जगात बदल घडवून आणण्याची ताकद शिक्षण क्षेत्रामध्ये आहे. यात माजी विद्यार्थ्यांचे कोणते योगदान घेता येईल याकरिता माजी विद्यार्थी संघ उभा झाला असल्याचे ते म्हणाले. सोबतच उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांचे त्यांनी स्वागत केले. प्रसिद्ध सीने अभिनेता सोनू सूद, चित्रपट निर्माता दिग्दर्शक राजकुमार हिरानी, मधु श्रीवास्तव, सिने अभिनेता शहबाज खान यांचा व्हिडिओ संदेश यावेळी दाखविण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. राजकुमार खापेकर व डॉ. वैदही चौरे यांनी केले तर आभार प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी मानले. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी समितीचे सदस्य आमदार डॉ. रामदास आंबटकर, सर्वश्री मनीष वंजारे, राजेश बागडी, डॉ. पांडुरंग डांगे, डॉ. रोशनी खेळकर, डॉ. योगेश भुते, प्रा. डहाके, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री वामन तुर्के, डॉ. रामदास भुते, डॉ. संतोष कसबेकर, डॉ. अनंत पांडे, डॉ. दत्तात्रय वाटमोडे, डॉ. राजकुमार खापेकर, डॉ. नंदाश्री भुरे, डॉ. अमिषी अरोरा, डॉ. अनुराधा खाडे, डॉ. विजयंता विटनकर, डॉ. कविता कान्होलकर, डॉ. सतीश चाफले, श्री प्रमोद तिजारे, डॉ. सोपानदेव पिसे, डॉ. मनीषा यमसनवार, डॉ. टारझन गायकवाड यांनी प्रयत्न केले.

## विद्यापीठात जीवनाची जडणघडण – श्री. सिरपूरकर




विद्यापीठात येण्यापूर्वी आपण बालक असतो. जीवनाची खरी जडणघडण विद्यापीठात होत असल्याचे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री विकास सिरपूरकर यांनी केले. अनेक नररत्न या विद्यापीठाने दिले असून बाबा आमटे हे मोठे नररत्न असून अपेक्षा नसताना समाजाला संपूर्ण आयुष्य त्यांनी दिले. याच विद्यापीठात माझे व्यक्तिमत्व घडले आहे. व्यक्तिमत्व विद्यापीठ घडवत असून या विद्यापीठाचा मी विद्यार्थी होतो म्हणून स्वतःला धन्य समजतो असे ते म्हणाले. भाषणाची सुरुवात करताना त्यांनी नागपूर विद्यापीठामध्ये १९६२ मध्ये प्रवेश घेतला असून त्यांचा नोंदणी क्रमांक देखील त्यांनी सांगितला.




## विद्यार्थी विद्यापीठाचे ब्रँड अँबेसिडर - डॉ. प्रशांत बोकारे

येथून शिक्षण घेऊन गेलेले विद्यार्थी संपूर्ण जगात असल्याने जगभरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे नाव होते आहे. विद्यार्थी हेच विद्यापीठाचे ब्रँड अँबेसिडर असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले. शताब्दी महोत्सव साजरा होत असताना माजी विद्यार्थ्यांना विद्यापीठात बोलावणे हा ऐतिहासिक क्षण आहे. जगाच्या रंगमंचावर विद्यार्थ्यांनी कोणते कार्य केले. कसे विद्यार्थी घडविले यावरच विद्यापीठाचे यश असते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या ज्ञानाचा कर्तुत्वाचा डंका जगात पिटला आहे. न्यायमूर्ती, प्रसिद्ध कलावंत, वैद्यकीय आदी विविध क्षेत्रात नामवंत विद्यार्थी घडवीत विद्यापीठाने सार्थपणे १०० वर्षे पूर्ण केले. यापुढे समाजाला भेडसावणाऱ्या सर्व समस्यांवर समाधान शोधणे हे विद्यापीठाचे लक्ष राहणार असून त्या दृष्टीने संशोधन केले जाणार असल्याचे कुलगुरू म्हणाले.




## विद्यापीठाने दाखविला यशाचा मार्ग - डॉ. गिरीश ओक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा एक भाग होतो, याचा अभिमान असल्याचे सांगत विद्यापीठानेच यशाचा मार्ग दाखविला, असे मनोगत प्रसिद्ध सिने अभिनेता डॉ. गिरीश ओक यांनी व्यक्त केले. त्यांनी त्यांच्या मनोगतात वैद्यकीय शिक्षण घेत असताना विविध आठवणींना उजाळा दिला. याच ठिकाणी नाट्य क्षेत्रात यशस्वी होण्याचा मार्ग गवसला असे ते म्हणाले. शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात शिक्षण घेत असताना दोन वेळा संप केल्याचे त्यांनी सांगितले. या यशस्वी संपातूनच आयुर्वेद विद्यार्थ्यांना शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी होता आले, असे ते म्हणाले.

# शताब्दी महोत्सव समारोप समारोहातील क्षणचित्रे

## आदर्श संस्था-अधिकारी -कर्मचारी पुरस्कार






































# शताब्दी महोत्सव समारोप समारोहातील क्षणचित्रे

## आदर्श विद्यार्थी पुरस्कार
















## 'क्रांतिनायक'ला मिळाली रसिकांची दाद
### शताब्दी महोत्सव समापन समारोह निमित्त आयोजन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समग्र जीवनावर आधारित 'क्रांतिनायक' या महानाट्याचा ५३ वा प्रयोग शनिवारी (३ ) डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात झाला. या प्रयोगाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव समापन समारोह निमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनद्वारा आयोजित करण्यात आलेल्या या महानाट्याची निर्मिती रंगभूमी, नागपूरद्वारे करण्यात आली होती.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, श्री प्रमोद तिजारे, रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांच्यासह अन्य उपस्थित होते. 'क्रांतीनायक' या महानाट्यतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवन चरित्राचे दर्शन प्रेक्षकांना घडले. महाराजांचे जन्मगाव अमरावती जिल्ह्यातील यावली शहीद, कर्मभूमी चिमूर येथील विविध घटना महानाट्याद्वारे दर्शविण्यात आल्या. माणिक उर्फ तुकडोजी ते देवबाबा आणि त्यानंतर तुकडोजी महाराज ते राष्ट्रसंत या उपाधी पर्यंत संपूर्ण जीवनचरित्र महानाटकातून दर्शविण्यात आले. महाराजांना अपेक्षित असलेली आदर्श गावावरून आदर्श देशाची संकल्पना महानाट्यतून साकारण्यात आली. पुरुषोत्तम मिराशी लिखित या महानाट्याचे दिग्दर्शन विलास कुबडे यांनी केले. राष्ट्रसंतांची भूमिका रमेश लखमापुरे यांनी सांगितली. संगीत वीरेंद्र लाटणकर, नृत्यदिग्दर्शन सतीश बगडे, निर्मिती अमित कुबडे, प्रकाशयोजना किशोर बत्तासे, निर्मितीसाहाय्य वामन काचोळे, विशेष मार्गदर्शन संजय रहाटे, वेशभूषा श्यामला कुबडे, रंगभूषा लालजी श्रीवास, नेपथ्य रमेश शेळके यांचे होते. अपर्णा लखमापुरे, रेश्मा इंदूरकर, बिस्मार्क भिवगडे, अमित सावरकर, नितीन पात्रीकर, भास्कर मेश्राम, मिलिंद रामटेके, मोहन पात्रीकर, दीप्ती भाके, मालती वराडे, वर्षा मानकर, स्वप्नील भोंगाडे, नंदू मानकर, प्रशांत मंग्दे, अभिषेक बेल्लारवार, रवींद्र भुसारी, अशोक गवळी, तुषार पाठक, श्रद्धा रायकर, श्रीकांत धबडगावकर, वैभव नक्षिने, करुणा मंग्दे यांच्यासह ६० कलावंताच्या चमूने नृत्य, संगीत, नाट्याच्या माध्यमातून तुकडोजी महाराजांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बीनीवाले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, छाया खोब्रागडे, कल्याणी मेश्राम यांनी सहकार्य केले.




## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनदर्शन ग्रंथांचे विमोचन
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पुढाकार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित दोन ग्रंथांचे विमोचन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १०१ वा वर्धापन दिन आणि शताब्दी महोत्सव समापन समारोह सिव्हिल लाईन येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात रविवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमात दोन्ही ग्रंथांचे विमोचन करण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने शताब्दी महोत्सवी वर्षात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार-प्रचार करण्याबाबत निर्णय घेतला होता. या अनुषंगाने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वैचारिक वाड्:मय प्रकाशन समिती देखील निर्माण केली होती. या समितीच्या मार्गदर्शनाखाली 'वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनदर्शन' आणि 'राष्ट्रसंतांची जनजागृती चळवळ' या दोन ग्रंथांची रचना केली आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनदर्शन या ग्रंथाचे लेखन डॉ. सुभाष सावरकर यांनी केले आहे. दोन्ही ग्रंथांचे विमोचन जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, कृषीतज्ञ डॉ. चारुदत्त मायी, विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वैचारिक वाड्:मय प्रकाशन समितीत अध्यक्ष म्हणून मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, सचिव म्हणून विद्यापीठाचे प्रकाशन अधिकारी श्री. प्रवीण गोतमारे तर सदस्यांमध्ये गुरुकुंज मोझरी येथील श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस श्री जनार्दनपंत बोथे गुरुजी, डॉ. ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक, डॉ. सुभाष सावरकर, डॉ. कोमल ठाकरे, डॉ. रत्नाकर भेलकर, डॉ. विजयालक्ष्मी थोटे, डॉ. गिरीश सपाटे यांचा समावेश आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनदर्शन व राष्ट्रसंतांची जनजागृती चळवळ या दोन्ही ग्रंथांमुळे राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार प्रचार होण्यास मदत होणार आहे. राष्ट्रसंतांचे जीवनदर्शन या ग्रंथामध्ये जनान्तरातून वनांतरी, योगसाधना, साधना जीवनयोगाची, संयोजन, क्रांती, नवनिर्माण, राष्ट्रधर्म, संघटन, परिवर्तन, जनजागृती, महानिर्वाण आदी अकरा प्रकरणांचा समावेश आहे. तर राष्ट्रसंतांची जनजागृती चळवळ या ग्रंथामध्ये एकूण २४ प्रकरण आहेत.



## शिक्षणातूनच जीवन मूल्ये प्रगल्भ होतात - निवृत्त न्यायमूर्ती श्री जे एन पटेल

आदर्श आचार विचारातून समृद्ध समाज निर्माण होतो. जीवन एक प्रवाह असून त्यातूनच चांगल्या वाईटाची ही जाण होत असते. म्हणूनच उत्तम शिक्षणाची पायाभरणी जीवन मूल्ये प्रगल्भ करीत असतात असे मत सेवानिवृत्त न्यायमूर्ती जे. एन पटेल. यांनी व्यक्त केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त विविध क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्या १०० माजी विद्यार्थ्यांचा सत्कार शताब्दी महोत्सव समारोप समारोहात करण्यात आला होता. काही अपरिहार्य कारणामुळे या सत्कार सोहोळ्यास निवृत्त न्यायमूर्ती श्री जे. एन. पटेल, चित्रपट कलावंत आणि सामाजिक कार्यकर्ते श्री सोनू सुद, ज्येष्ठ अभिनेता श्री शाहाबाज खान हे उपस्थित राहू शकले नसल्याने या मान्यवरांना त्यांच्या मुंबईच्या निवासस्थानी जाऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे पुरस्कृत करण्यात आले.

आम्हाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असल्याचा सार्थ अभिमान आहे. आज आम्ही ज्या सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहोत त्याचे मूळ आम्हाला घडवीणारे आमचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आहे, असे गौरवोदगार श्री. सोनू सुद आणि श्री शाहाबाज खान यांनी या अनौपचारिक चर्चेदरम्यान व्यक्त केले. या प्रसंगी श्री सोनू सुद यांनी त्यांचे 'मै मसीहा नहीं ' हे पुस्तक भेट दिले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने माजी विद्यार्थी मंडळाच्या सचिव डॉ. कल्पना पांडे आणि शताब्दी महोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम समन्वयक श्री प्रमोद तिजारे यांनी मान्यवरांना भेटवस्तू प्रदान केली. या प्रसंगी ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक श्री. यश जी. चव्हाण, चित्रपट अभिनेता श्री. पराग भावसार आणि माजी विद्यार्थी मंडळाच्या सदस्य डॉ. मनिषा यमसनवार उपस्थित होते.





## कौशल्यातून रोजगार प्राप्त करून जीवनात व्हावे यशस्वी
## प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांचे प्रतिपादन
## मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना अंमलबजावणीबाबत विद्यापीठात कार्यशाळा

महाराष्ट्र सरकारने उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून कौशल्य पूर्ण करीत त्यातून रोजगार प्राप्त करून जीवनात यशस्वी होण्याचे आवाहन प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना (शिष्यवृत्ती) बाबत कार्यशाळा अंबाझरी मार्गावरील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गुरुनानक भवन येथे सोमवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडली. या कार्यशाळेत प्रभारी कुलगुरू डॉ. बोकारे मार्गदर्शन करीत होते.

कार्यशाळेचे अध्यक्षस्थान माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी भूषविले. कुलसचिव डॉ. राजू हिवसे व मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या शिष्यवृत्ती योजनेमुळे पैसे नसले तरी विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी आता प्रवेश घेता येणार आहे. सर्व विद्यार्थिनींनी याचा लाभ घेण्याचे आवाहन करीत योजना केवळ प्रवेश घेण्यापूर्ती मर्यादित राहू नये. मिळालेल्या शिष्यवृत्तीतून अभ्यासक्रमातून कौशल्य प्राप्त करीत त्यातून रोजगाराच्या माध्यमातून यशस्वी व्हावे, असे कुलगुरू म्हणाले. शिष्यवृत्तीबाबत काही अडचणी असतील तर त्याची सोडवणूक करण्याचे निर्देश कुलगुरूंनी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रतिनिधी, स्वायत्त विभागांचे विभाग प्रमुख, कर्मचारी यांना दिले. विद्यार्थिनींकडून कोणतेही शुल्क आकारू नये असे सांगत ही सुवर्णसंधी असून विद्यार्थिनींनी याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेबाबत मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी उपस्थित प्राचार्य, विभाग प्रमुख, कर्मचारी विद्यार्थ्यांना माहिती दिली. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेबाबत प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांनी एक एक बारकावे समजावून सांगितले. कार्यशाळेचे संचालन शिष्यवृत्ती कक्षाचे चंद्रशेखर शेळके यांनी केले तर आभार डॉ. शामराव कोरेटी यांनी मानले. कार्यशाळेला सर्व विभाग प्रमुख, सर्व संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, शैक्षणिक विभागातील व महाविद्यालयातील संबंधित सर्व कर्मचारी तसेच विद्यार्थिनींनी उपस्थित होते.

### *मुलींना मोफत शिक्षण (शिष्यवृत्ती) योजना *

महाराष्ट्र शासनाने राज्यातील शासकीय महाविद्यालय, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यता प्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा

शुल्काचा १०० टक्के लाभ देणारी शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. शैक्षणिक सत्र २०२४-२५ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थिनींनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत, अशा महाराष्ट्रातील अधिवासधारक विहित अटी व शर्तीची पूर्तता करतील, अशा सर्व पात्र मुलींना या योजनेचा लाभ पुढे लागू राहील. पालकांचे उत्पन्न ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या मुलीच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण मोफत केले आहे. योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे (https://mahadbt.maharashta.gov.in) या संकेतस्थळावरून विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमांचे वार्षिक शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क या शुल्काचा यात समावेश आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शुल्क नियामक प्राधिकरण व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेले १०० टक्के मर्यादिपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात येईल. सदरचे शुल्क हे शासनमान्य प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता संबंधित विद्यापीठ तंत्र शिक्षण मंडळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ इत्यादी कडून आकारण्यात येणारे परीक्षा शुल्क व शासन मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे १०० टक्के मर्यादिपर्यंत परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती स्वरूपात पात्र विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्याचा पुरावा, सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र, कुटुंबातील दोन्ही पालकांचे मागील वर्षाचे एकत्रित उत्पन्न प्रमाणपत्र किमान संबंधित तहसीलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांचे असावे. लहान कुटुंबाचे स्वयंघोषित प्रमाणपत्र असावे अभ्यासक्रमात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र सादर करावे. नवीन अर्ज करताना दहावी व बारावीची गुणपत्रिका आवश्यक असेल तसेच नूतनीकरणाकरिता मागील वर्षाची गुणपत्रिका आवश्यक आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर २०१७ मध्ये नमूद असलेल्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांना सदर योजना लागू आहे. प्रवेश घेताना मुलींना शिक्षण शुल्क महाविद्यालयास भरावे लागणार नाही. सदर योजनेअंतर्गत मुलींना अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षणशुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित मुलींकडून प्रवेशाच्या वेळी आगाऊ स्वरूपात घेण्यात येऊ नये व विद्यार्थिनींची पिळवणूक होणार नाही, याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल, याबाबत विभागामार्फत निर्देश देण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारी परीक्षा शुल्क लाभाची रक्कम ही थेट स्वरूपात लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात संबंधित प्रशासकीय विभागाकडून वितरित होणार आहे. त्यामुळे सदरचे शुल्क महाविद्यालयास भरणे आवश्यक आहे. योजनेसाठी आवेदन पत्र सादर केलेल्या व अटी व शर्तींची पूर्तता होत असलेल्या विद्यार्थिनीस या शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल. या योजनेचा लाभ कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपुरता मर्यादित आहे. सदर योजना पूर्णवेळ अभ्यासक्रमासाठी मागील सत्रातील किमान ५० % उपस्थितीची अट पूर्ण करणाऱ्या मुलींना लागू आहे. योजने करिता आधार क्रमांक आवश्यक आहे. सदर योजना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक घटकातील ( EBC/EWS), इतर मागास प्रवर्गातील (OBC) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासव प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील पात्र मुलींना लागू आहे. ऑनलाइन अर्ज सादर करते वेळी आधार संलग्नित बँक खाते, महाविद्यालयांची प्रवेश पावती, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला आदी कागदपत्रांची आवश्यकता आहे. अर्जदाराने महाडीबीटी पोर्टलद्वारे भरलेल्या ऑनलाईन अर्जाची छाननी महाविद्यालय विभाग स्तर व संचालनालय (राज्यस्तर) अशी तीन स्तरावर करण्यात येणार आहे.

## ॲझोला 'मॉस्किटो फर्न' करेल डासांवर नियंत्रण
## ॲझोला दुर्लक्षित वनस्पतीद्वारे डेंग्यू व चिकनगुनिया यावर नियंत्रणाबाबत संशोधन
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि अर्जुनी मोरगावच्या एस. एस. जयस्वाल महाविद्यालयाचा पुढाकार



डॉ. ढोबळे     डॉ. शरद देशमुख

पावसाळा सुरू झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात डासांचा प्रकोप वाढतो. यातूनच डेंग्यू, चिकनगुनिया यासारखे जीवघेणे आजार तोंडवर काढतात. ॲझोला 'मॉस्किटो फर्न' या दुर्मिळ वनस्पतीद्वारे डासांवर नियंत्रण ठेवणारे संशोधन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि अर्जुनी मोरगाव येथील एस. एस. जयस्वाल महाविद्यालयाने संयुक्तरीत्या केले आहे. यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागातील डासांचा प्रकोप नियंत्रित करीत गंभीर आजाराची तीव्रता कमी करणे शक्य होणार आहे.

ॲझोला ही वनस्पती मानवी जीवनासाठी तसेच वातावरणातील बदलावांमुळे होणाऱ्या परिणामांना नियंत्रित करण्यासाठी एक उपयुक्त वनस्पती आहे. तिचे विविध उपयोग मानवास फायद्याचे आहेत. परंतु सहज साध्या पद्धतीने व झपाट्याने वाढणाऱ्या वनस्पतीकडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. ही वनस्पती हजारो वर्षांपूर्वी भातशेती पिकासाठी जैविक खत म्हणून व तसेच तणाचा प्रभाव कमी करण्यासाठी उपयोगात आणल्या गेली होती. त्याचा पुरावा 'जिया सु (Jia Si X)' यांनी ५४० व्या शतकात लिहिलेल्या पुस्तकात आढळून येतो. याव्यतिरिक्त ॲझोला वनस्पतीचे विविध उपयोग जनसमुदायास होतात व ते पूर्णपणे दुर्लक्षित झालेले आहेत.

सदर वनस्पतीचे महत्त्वाचे उपयोग लक्षात घेता गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव येथील एस. एस. महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. शरद रामदास देशमुख आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे यांच्या संयुक्त उपक्रमातून संशोधन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या संदर्भात संशोधन प्रस्ताव, संशोधन आणि विकास सेल, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे सादर केला होता व तो या वनस्पतीचे महत्त्व लक्षात घेता विद्यापीठाने मान्यही केला.

## रोगांचा फैलाव नियंत्रित करण्यास मदत

या संशोधन कार्यात या वनस्पतीची मानवी आरोग्यासाठी विशेष उपयुक्तता आढळून आली आहे. आजच्या काळात विशेषतः पावसाळ्यात झिका वायरस, चिकनगुनिया, पिवळा ताप, डेंग्यू, मलेरिया, इत्यादी यासारख्या मानवास घातक असलेल्या रोगांचा फैलाव झाल्याचे दिसून येते व त्यात अनेकांचे बळी जातात. या रोगांचा फैलाव फक्त ग्रामीण नव्हे तर शहरी भागातही मोठ्या प्रमाणात झाल्याचे आढळून येते. रोगांचा फैलाव डासांपासून मानवास होतो. त्यासाठी डासांच्या वाढीवर नियंत्रण मिळविणे गरजेचे आहे जे कठीण आहे. पावसाळी वातावरणात अनेक ठिकाणी डबके साचतात व डासांच्या वाढीसाठी पोषक ठरतात. संशोधनातून असे आढळून आले की, ॲझोला वनस्पतीची घरोघरी लागवड केली असता डासांची पैदास चांगल्या प्रकारे नियंत्रित केल्या जाऊ शकते व त्यामुळे डासांपासून होणारे जीवघेण्या रोगांपासून मुक्ती मिळू शकते. साचलेल्या पाण्यामध्ये पावसाळ्यात ॲझोला वनस्पतीची लागवड केल्यास भवतालच्या परिसरातील संपूर्ण डासाचे नियंत्रण करता येईल व त्यामुळे विविध जीवघेण्या रोगांचा प्रादुर्भाव रोखता येईल.

डासांची पैदास रोखण्याची ॲझोलाची क्षमता आणि त्यामुळे प्लाझोडियमचा प्रसार थांबविण्याची शक्ती असल्यामुळे ॲझोलाला 'मॉस्किटो फर्न' असेही संबोधण्यात येते. ॲझोलाचे डासांना रोखण्याच्या क्षमतेचे मुख्य कारण म्हणजे ॲझोलाचे पूर्ण आवरण क्युलेक्स डासांना अंडी घालण्याला प्रतिबंध करू शकते. जेव्हा पाण्याचा ७५ टक्के पेक्षा जास्त पृष्ठभाग ॲझोलाने व्यापलेला असतो तेव्हा अळ्यांची घनता मोठ्या प्रमाणात कमी होते. डासांच्या संख्येत लक्षणीय घट करण्यासाठी आवश्यक असलेले कव्हरेज व्यवहारीक दृष्ट्या अशक्य वाटत असले तरी सर्वांनी एकत्रितरित्या घरोघरी ॲझोलाची लागवड केली असता डासांच्या निर्मितीवर नियंत्रण करता येऊ शकते. त्याकरिता जनतेमध्ये लोकजागृती करणे आवश्यक आहे. तसेच शासनाने पुढाकार घेतल्यास बऱ्याच प्रमाणात डासांचे अर्थातच डेंग्यू सारख्या रोगांचे नियंत्रण करू शकतो.

ॲझोला शहरात व खेडेगावात सुद्धा डेंग्यू आणि चिकनगुनियाचा वाढलेला प्रसार रोखण्यासाठी उपयुक्त ठरेल. सध्या नागपुरात झोन निहाय आशा स्वयंसेविकाद्वारे सुरू असलेल्या सर्वेक्षणात आतापर्यंत ३२,१२१ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये दूषित भांडी, कुलर, टायर, कुंड्या, ड्रम, मडके व पक्षी व प्राण्यांची भांडी यामध्ये चिकनगुनिया डासांचा लारवा आढळून आला. यासाठी या सर्व ठिकाणी ॲझोलाची लागवड केली तर आपण डासांवर नियंत्रण मिळवू शकतो. यासाठी हे संशोधन डास नियंत्रण करून डेंगू चिकनगुनिया सारख्या रोगांवर नियंत्रण आणण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास डॉ. शरद देशमुख व डॉ. संजय ढोबळे यांनी दाखवला आहे.

संशोधनात असे आढळून आले आहे की घरांमध्ये विशिष्ट पद्धतीने ॲजोलाची लागवड केली तर डासांच्या वाढीवर काही दिवसांमध्येच व बरेच दिवसांकरिता प्रतिबंध करता येते. तसेच ॲझोला तलाव, विहीर व इतर साचलेल्या पाण्यामध्ये डासांची पैदास जवळजवळ पूर्णपणे नियंत्रित करता येते. ॲझोला एक उपयुक्त वनस्पती आहे व त्याचे अनेक फायदे मानव जातीस होऊ शकतात. त्या संदर्भात हवेतील प्रदूषणाचा वाईट परिणाम आपल्या आरोग्यास होत आहे. त्याचा विचार करिता प्रदूषणावर नियंत्रण करण्यासाठी संशोधनामध्ये उपकरण तयार केले असून त्याचे आंतरराष्ट्रीय पेटंट प्राप्त झाले आहे. या संशोधन कार्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल तसेच विज्ञान व तंत्रज्ञान अभ्यास शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांनी प्रोत्साहन दिले आहे. संशोधनाचा प्रस्ताव संचालक, संशोधन आणि विकास सेल, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी स्वीकारला व त्याला अर्थसहाय्य केले. त्याबद्दल त्यांचे संशोधकांनी आभार व्यक्त केले आहे. संशोधन कार्यास एस. एस. जयस्वाल महाविद्यालयाचे संस्थाध्यक्ष माननीय श्री लूनकरंजी चितलांगे, उपाध्यक्ष बद्रीप्रसादजी जयस्वाल, श्री दुर्गा शिक्षण संस्था सचिव श्री मुकेशजी जयस्वाल यांनी प्रोत्साहन दिले. त्याबद्दल त्यांचे संशोधकांनी आभार व्यक्त केले. शिवप्रसाद सदानंद जयस्वाल महाविद्यालय, अर्जुनी मोरगावचे डॉ. ईश्वर माहुले यांनी संशोधन कार्यास मदत करून प्रोत्साहित केल्याबद्दल त्यांचे सुद्धा आभार मानले.





## राष्ट्रसंतांचे वाङःमय वेदनेतून निर्माण झालेला वेद
## हभप श्री प्रकाश महाराज वाघ यांचे प्रतिपादन
### श्री गुरुदेव क्रांतीज्योत यात्रेचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात उस्फूर्त स्वागत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे वाङःमय वेदनेतून निर्माण झालेला वेद असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम येथील केंद्रीय प्रचार सेवाधिकारी हभप श्री प्रकाश महाराज वाघ यांनी केले. अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम केंद्रीय प्रचार कार्यालय अंतर्गत श्री गुरुदेव क्रांतीज्योत यात्रा काढण्यात आली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रात क्रांतीज्योत यात्रेचे मंगळवार, दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी उस्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात श्री प्रकाश महाराज वाघ मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे होते तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, गुरुदेव सेवा मंडळाचे केंद्रीय प्रचार सेवाधिकारी हभप श्री प्रकाश महाराज वाघ, विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, गुरुदेव सेवा मंडळाचे उपसर्वाधिकारी हभप श्री दामोदरपंत पाटील गुरुजी, क्रांतीज्योत यात्रा प्रमुख श्री. सुशीलकुमार बुरडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी त्यांच्या भजनातून लोकांमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण केली. त्यांच्या लेखणीचे वेगळे वैशिष्ट्य होते. त्यांनी झोपडीत जाऊन प्रत्येकाचे दुःख- वेदना जाणून घेतल्या, असे प्रकाश महाराज वाघ पुढे बोलताना म्हणाले. सद्यस्थितीत व्यक्ती राष्ट्रीयतेला विसरत चालला आहे. आपणास हे स्वातंत्र्य फुकट मिळालेले नाही, अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. चिमूर, आष्टी, यावली, लोणी, अड्याळ अशा विविध ठिकाणी राष्ट्रसंतांच्या प्रेरणेतून लोकांनी क्रांती केली. नागपंचमीच्या दिवशी झालेल्या आंदोलनात आष्टी येथे ७ जण, चिमूर येथे ९ जण तर यावलीत ८ जण शहीद झाले. यामध्ये लहान बालकांचा देखील समावेश होता. या क्रांतीतून देशातील पहिले स्वातंत्र्य चिमूरला मिळाले, असे वाघ महाराज म्हणाले. संत असून देखील तुकडोजी महाराजांना देशाच्या स्वातंत्र्यासाठी जेलमध्ये जावे लागले. त्यावेळेस हजारो लोक चंद्रपूर ते नागपूर असे पायदळ आले. राष्ट्रसंतांनी देश हाच देव असल्याचा संदेश दिला. राष्ट्रसंतांचे नाव असलेल्या विद्यापीठात सन्मान होणे हे आमचे अहोभाग्य असल्याचे श्री प्रकाश महाराज वाघ म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी त्यांच्या भजनातून सांगितलेली सामाजिक मूल्ये जपण्याचे आवाहन केले. राष्ट्रसंतांनी स्वातंत्र्याची प्रथम ज्योत विदर्भात चिमूरला पेटविली. गावागावातील माणूस स्वातंत्र्यलढ्यासाठी राष्ट्रसंतांनी तयार केला. देह हेच मंदिर असून देह जागृत झाला तर समाज जागृत होऊ शकतो, असे विचार राष्ट्रसंतांनी दिल्याचे डॉ. दुधे म्हणाले. मानवाला देव बनविले तर गाव स्वर्ग बनेल अश्या राष्ट्रसंतांच्या विचारांची आज नितांत गरज आहे. निसर्गाने निर्माण केलेल्या शाश्वत गोष्टींचे जतन केले पाहिजे. गुरुदेव सेवा मंडळ हेच कार्य करीत आहेत. समाधान, शांती मिळवायची असेल तर राष्ट्रसंतांचे तत्त्वज्ञान प्रत्येक घरापर्यंत पोहोचवावे लागेल, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक करताना राष्ट्रसंत अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी क्रांतीज्योत यात्रेबाबत माहिती दिली. स्वातंत्र्य लढ्यात १९४२ मध्ये ग्रामीण भागातील जनतेला जागृत करण्याचे कार्य राष्ट्रसंतांनी केले. शस्त्र चालविता येत नव्हती, ज्यांना शेती येत होती. अशा ग्रामीण भागात भजनाच्या माध्यमातून जनमत चेतविण्याचे कार्य राष्ट्रसंतांनी केल्याचे डॉ. थोटे यांनी सांगितले. तत्पूर्वी क्रांतीज्योत माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, हभप प्रकाश महाराज वाघ यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार प्रा. देवमण कामडे यांनी मानले. कार्यक्रमाला श्री गुरुदेव सेवा मंडळ श्रीक्षेत्र गुरुकुंज येथील कार्यकारणी सदस्य श्री. बाबाराव पाटील, नागपूर जिल्हा सेवाधिकारी श्री. निळकंठ कळंबे गुरुजी, अकोला जिल्हा युवक संघटन अध्यक्ष श्री राजेंद्र गाडगे, पालखी पूजक हभप एकनाथ गावत्रे, क्रांतीज्योत व्यवस्थापक श्री. गजानन अजमिरे, नागपूर जिल्हा प्रचार प्रमुख श्री. पुंडलिकबाबूजी चौधरी, पालखी संयोजक राजेंद्रजी कंठाळे, दहेगाव रंगारी प्रचारक श्री. सुरेशराव चौधरी, श्री वासुदेवराव अंबाडकर, अध्यासन केंद्रातील कल्याणी मेश्राम यांच्यासह क्रांतीज्योत यात्रेत सहभागी प्रचारक उपस्थित होते.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रथमच 'जेंडर ऑडिट' माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांना अहवाल सादर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रथमच विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) च्या दिशा-निर्देशानुसार जेंडर ऑडिट करण्यात आले. कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या वतीने माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्याकडे 'जेंडर ऑडिट रिपोर्ट' मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजी सादर करण्यात आला. विद्यापीठ अनुदान आयोगाकडे या अहवालाची प्रत सादर केली जाणार आहे. अहवालानुसार विद्यापीठाने लैंगिक समानता आणि संवेदनशीलतेच्या दिशेने लक्षणीय प्रगती केली आहे.

'जेंडर ऑडिट रिपोर्ट' सादर करताना कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या अध्यक्षा डॉ. शालिनी लिहितकर, सदस्य सचिव डॉ. मंजुषा गडकरी, सदस्य डॉ. प्रविणा खोब्रागडे, डॉ. वंदना धवड, डॉ. राजेंद्र ऊतखेडे, श्रीमती माधुरी साकुलकर, कु. दिपाली मानकर, कु. दिव्या राठोड, कु. अन्नपूर्णा पारधी यांची उपस्थिती होती. भारत सरकारच्या कायदा आणि न्याय मंत्रालयाने २०१३ मध्ये कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेचा दृष्टीने लैंगिक छळाचा कायदा केला आहे. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१५ मध्ये उच्च शिक्षण संस्थांमध्ये महिला कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा लैंगिक छळ प्रतिबंध आणि निवारणाशी संबंधित दिशा-निर्देश दिले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबत २ मे २०१६ रोजी अधिसूचना जारी केली आहे. यानुसार विद्यापीठाने कामाच्या ठिकाणी किंवा अंतर्गत तक्रार समिती महिलांच्या लैंगिक छळ आणि लैंगिक भेदभावाविरूद्ध संरक्षणासाठी समिती स्थापन केली आहे. विद्यार्थिनींना शैक्षणिक विभागात, महिला कर्मचाऱ्यांना प्रशासनात कार्यस्थळी सुरक्षित वातावरण निर्माण करुन देण्यासाठी समिती प्रयत्नरत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिशा-निर्देशानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शैक्षणिक सत्र २०२३-२४ दरम्यान प्रथमच 'जेंडर ऑडिट' करण्यात आले. विद्यापीठ प्रशासन, स्वायत्त शैक्षणिक विभाग, संचालित व संलग्नित महाविद्यालय या ठिकाणी उपलब्ध डेटा, तक्रारी, विविध प्रश्नावलीच्या आधारे माहिती गोळा करीत हा अहवाल तयार करण्यात आला.

प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांना सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या आधारे विद्यापीठ अंतर्गत विविध विभाग आणि विभागांमध्ये लैंगिक समानता आणि संवेदनशीलतेच्या दिशेने लक्षणीय प्रगती झाल्याचे दिसून आले आहे. बहुसंख्य कर्मचारी किमान भेदभावासह लिंग-समान वातावरण अनुभवतात. बऱ्याच कर्मचाऱ्यांकडे लिंग संवेदनाबाबत पुरेसे ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टीकोन असल्याचे दिसून आले. बऱ्याच विभागांनी मार्गदर्शक तत्त्वे नोकरीच्या कामगिरीचे निकष आणि धोरणात्मक नियोजनामध्ये एकत्रित केलेले आहेत. बऱ्याच विभागांनी लिंग धोरणे लिहिली आहेत, परंतु काही कर्मचाऱ्यांना त्याबद्दल माहिती नाही. अशा ठिकाणी जनजागृती करण्याची गरज अहवालातून व्यक्त करण्यात आली. महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याच्या आणि लैंगिक समस्यांवर खुल्या चर्चेला प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. सोबतच या सुधारणा कायम ठेवण्यासाठी आणि वाढविण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे अहवालात म्हटले आहे. याव्यतिरिक्त, लैंगिक छळ, बाल संगोपन, रजा धोरणे आणि लिंग-संवेदनशील वर्तन याबद्दल जागरूकता आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यावर अहवालात भर देण्यात आला आहे. सर्वांसाठी सुरक्षित आणि सहायक कार्य वातावरण सुनिश्चित करण्यासाठी अधिक व्यापकपणे उपाययोजना करणे आवश्यक आहे. एकूण ३८ पानांचा 'जेंडर ऑडिट रिपोर्ट' विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर केला जाणार आहे.

## समितीकडून वर्षभरात विविध कार्यक्रम

सर्वोच्च न्यायालय, युजीसी दिशा-निर्देश कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, प्रतिबंध आणि निवारण) कायदा २०१३ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, विद्यापीठात कोणत्याही लिंगाचा लैंगिक छळ रोखण्याच्या उद्देशाने विद्यापीठाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली आहे. या समितीचे मूळ काम लैंगिक छळाविरुद्धच्या तरतुदी सार्वजनिकपणे सूचित करणे आणि त्यांचा व्यापक प्रसार सुनिश्चित करणे.

सर्व लिंग आधारित हिंसाचाराच्या विरोधात निर्णयकपणे कार्य करणे. लैंगिक छळाबाबत शून्य सहिष्णुतेच्या धोरणासाठी कार्य करणे. लैंगिक भेदभावापासून मुक्तता निर्माण करणे. नियमित अभिमुखता आयोजित करणे किंवा लिंग समस्यांवरील प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे असे आहे. समितीकडून २५ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२३ दरम्यान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. सोबतच ८ डिसेंबर २०२३ रोजी लैंगिक समानता विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. विद्यापीठाचे प्रशासकीय विभाग, स्वायत्त विभाग, ग्रंथालय परिसर या ठिकाणी समिती सदस्यांच्या संपर्क क्रमांकसह फलक प्रदर्शित करण्यात आले आहे. आपत्कालीन स्थितीमध्ये मदत मागण्याकरिता हेल्पलाइन क्रमांक उदा. १८१, शीघ्र प्रतिसाद क्रमांक १११ आणि ९३७३८८१०३४ आदी क्रमांक महिलांना संकटातून बाहेर काढण्याकरिता देण्यात आले आहेत. समितीकडून सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये लैंगिक समानता व संवेदनशीलता याबाबत विविध कार्यक्रम आयोजित करीत जनजागृती करण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये अंतर्गत समिती स्थापन केल्याची माहिती समितीला प्राप्त झाली आहे. समितीची ठराविक कालावधीत नियमित बैठक घेतली जात असून आलेल्या प्रकरणांचा निपटारा केला जात आहे.





## लोकशाही मूल्यांची जपवणूक करावी - डॉ. संजय दुधे

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात स्वातंत्र्यदिन उत्साहात

भारत देश सुखीसंपन्न व्हावा म्हणून लोकशाही मूल्यांची जपवणूक करावी, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराज बाग स्थित प्रशासकीय इमारतीत गुरुवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ८ वाजता स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.



असंख्य समाज सुधारक, स्वातंत्र्य सैनिक आणि थोर पुरुषांच्या बलिदानातून आपणास स्वातंत्र्य मिळाले आहे. स्वतंत्र्य देश म्हणून आपण विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करीत आहोत. देशाचा विकास झाला असताना अनेक अभौतिक गोष्टी मागे पडत गेल्या. त्याचाच परिणाम प्रदूषण, पर्यावरणाचा असमतोल आहे. भौतिक गोष्टी भरपूर आहेत. मात्र, समाधान हरपत चालले आहे. त्यामुळे शाश्वत विकासातून देश सुखी संपन्न होणे आवश्यक आहे. सोबतच स्वच्छ- सुंदर भारतासाठी आपले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे डॉ. दुधे म्हणाले. तत्पूर्वी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर सर्वांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. यावेळी पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर यांनी सर्वांना स्वातंत्र्य रक्षणाची शपथ दिली.

यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांच्यासह विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर यांनी केले.







## दृष्टीकोन बदला, यशस्वी व्हाल - डॉ. संजय दुधे
## भूगर्भशास्त्र विभागात 'स्पर्धा परीक्षेसाठी भूगोल' कार्यक्रम
## भूगोल म्हणजे अवकाशीय विज्ञान - डॉ. -सुजाता डमके

स्वतःला कमी लेखण्याचा दृष्टिकोन बदला तरच जीवनात यशस्वी व्हाल, असे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. 'स्पर्धा परीक्षेसाठी भूगोल' कार्यक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागातील प्रो. एल. जी. ग्वालानी स्मृती सभागृहात शनिवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. यावेळी भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, डॉ. एस. एम. पोफरे, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था (नागपूर) येथील डॉ. सुजाता डमके, डॉ. एस. के. हुमणे, डॉ. बी. एस. मांजरे यांची उपस्थिती होती. भाषा ही अडचण नसून ज्ञान असेल तर सर्व शक्य आहे. सातत्याने प्रयत्न केल्याने अनेक गोष्टी शक्य होत असल्याचे डॉ. दुधे पुढे बोलताना म्हणाले. प्रत्येक व्यक्ती संशोधक, कलावंत असतो. त्यामुळे ज्या व्यक्तीला जे जमते, ती कला जोपासणे महत्त्वाचे आहे. कार्य करीत रहा, मार्ग आपोआप मिळत जातात असे डॉ. दुधे म्हणाले. अधिसभेचे सदस्य असताना विद्यापीठात भूगोल आणि समाजकार्य अभ्यासक्रम सुरू झाले पाहिजे याबाबत प्रस्ताव पारित करून घेतले होते. पुढे प्र-कुलगुरू झाल्यानंतर व्यवस्थापन परिषद विद्वत परिषदेच्या माध्यमातून अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत घटनाक्रम त्यांनी उलगडला. संलग्न महाविद्यालयातून अभ्यासक्रम शिकताना अडचणी येतात. मात्र, विद्यापीठाने विभाग सुरू केल्यानंतर त्या पदवीला विशेष महत्त्व प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच जीवनात सात गोष्टींचे पालन केल्यास यशस्वी होण्याचा मार्ग देखील त्यांनी त्यांच्या भाषणातून सांगितला.

'स्पर्धा परीक्षेसाठी भूगोल' या विषयावर बोलताना वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था (नागपूर) येथील डॉ. सुजाता डमके यांनी भुगोल म्हणजे अवकाशीय विज्ञान असल्याचे सांगितले. भूगोलामध्ये पृथ्वीवरील भूपृष्ठभागाचा भौतिक आणि मानवी जगाचा अभ्यास केला जातो. विज्ञान व तंत्रज्ञानाची प्रगती होत गेल्याने मानवी जीवन समृद्ध होत पृथ्वीच्या पृष्ठभागावर देखील बदल होत गेले. मानवी सभ्यतेच्या विकासाचे परिणाम दोन्ही ध्रुवांवर देखील दिसून येत आहे. त्यामुळे भूगोल विषयात भूगर्भशास्त्र, पर्यावरणशास्त्र, समुद्रशास्त्र आदी विविध अभ्यासक्रम स्वतंत्रपणे निर्माण झाले. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासासोबतच पृथ्वीच्या भूपृष्ठ भागावर झपाट्याने परिवर्तन होताना दिसून येत आहेत. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून या विषयावर अधिकाधिक अभ्यास होत असून सर्व विषयांची भूगोल ही माता असल्याचे डॉ. डमके यांनी सांगितले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करताना या विषयाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. संघराज्य लोकसेवा आयोगाची तयारी करताना भूगोल हा महत्त्वपूर्ण विषय आहे. प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्य करताना भूगोल विषयाचा सर्वाधिक फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित भूभागाचा अभ्यास असेल तर आपण यशस्वी अधिकारी होऊ शकता, असे त्यांनी सांगितले. जीआयएस यासह इसरो मध्ये देखील जाण्याची मोठी संधी भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांना आहे. त्यामुळे 'लोकल टू ग्लोबल' विचार करण्याची क्षमता निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी त्यांनी संघराज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतीबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे यांनी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत सविस्तर माहिती दिली. भूगोल हा विषय विज्ञान विषयाची संबंधित असून विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार एमएससी भूगोल हा अभ्यासक्रम सुरू केल्याचे सांगितले. पहिल्या बॅचमध्येच एका विद्यार्थिनीने सेट परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केल्याने अभ्यासक्रमाचे महत्त्व लक्षात येत असल्याचे ते म्हणाले. यावेळी डॉ. बी. एस. मांजरे, डॉ. एस. के. हुमणे, डॉ. ए. एम. पोफरे यांनी देखील मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विभागातील सेट परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थीनी प्रणिता काळे, यशस्वी विद्यार्थिनी कहकशा अन्सारी, पलक वासनिक, विशाखा कंगाले, पूजा गायधने, चित्रा पिपरधरे, तनुश्री निकोरे, श्रेया मेश्राम, पूजा इलमकर आदी विद्यार्थिनींचा अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रबद्ध संचालन चित्रा पिपरधरे, तनुश्री निकोरे व पूजा इलमकर या विद्यार्थिनींनी केले तर आभार श्रेया मेश्राम हिने मानले.








## वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत एनईपी अंमलबजावणीवर कार्यशाळा हिस्लॉप महाविद्यालयात आयोजन

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) अंमलबजावणीबाबत स्थानिक हिस्लॉप महाविद्यालयात बुधवार, दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी कार्यशाळा घेण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, दी असोसिएशन ऑफ चार्टर्ड सर्टिफाइड अकाउंटंट्स (ACCA, यूके) आणि हिस्लॉप महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने ही कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेला प्रमुख अतिथी म्हणून एसीसीएचे उत्तर भारत सीनियर बिजनेस क्षेत्रिय व्यवस्थापक श्री. रोहन राजवंशी, मुख्य वक्ता म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय कविश्वर, एसीसीए विशेषज्ञ समन्वयक श्री. मिलिंद डाते, आयोजन सचिव डॉ. हरिओम पुनियानी यांची उपस्थिती होती.अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार होत असलेल्या शिक्षण परिवर्तनात शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे सांगितले. शिक्षकांनी अद्यावत शैक्षणिक कौशल्य, सोबतच विषय ज्ञानासह सुसज्ज असले पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले. सातत्याने व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने तयार असले पाहिजे. शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कुतूहल आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांना प्रोत्साहन देणारा अनुकूल शिक्षण वातावरण तयार करण्याचे त्यांनी आवाहन केले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीबाबत त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. श्री मिलिंद डाते यांनी आंतर्राष्ट्रीय आर्थिक अहवाल मानके (IFRS) व भारतीय लेखा मानके (Ind AS) यावर चर्चा केली. त्यांनी IFRS च्या महत्त्वावर जोर दिला, जो विविध देशांतील लेखा नियम मानक बनवतो व लेखा प्रणालीतील गुंतागुंती व खर्च कमी करतो. त्यांनी शिक्षकांना थियरी आणि प्रॅक्टिकल ज्ञान एकत्र करून शिकवण्याचा सल्ला दिला. कार्यशाळेचे आयोजन सचिव तथा विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे सहअधिष्ठाता डॉ. हरिओम पुनियानी यांनी कार्यशाळेसाठी विद्यापीठ व एसीसीए अधिकाऱ्यांचे आभार मानले. या कार्यशाळेचा यशस्वी समारंभ झाला. कार्यशाळेला नागपूर, भंडारा, वर्धा, आणि गोंदिया येथील विविध संलग्न महाविद्यालयांतील सुमारे १२० शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला. आयोजन समितीतील सदस्य डॉ. सोनल अग्रवाल, डॉ. हरिंदर कौर, डॉ. राझेका खान, डॉ. दिनी मेनन, डॉ. महेश जोशी आणि इतर सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कठोर परिश्रम घेतले.




## नामवंत संस्थांसोबत शोधणार संशोधनाचे मार्ग

### मॉलिक्युलर बायोलॉजि आणि जेनेटिक इंजिनिअरिंग विभागात प्राथमिक बैठक

नामवंत राष्ट्रीय संशोधन संस्था आणि नागपूर येथील नामवंत शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने संशोधनाचे नवनवीन मार्ग शोधले जाणार आहे. याबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी आणि जेनेटिक इंजिनिअरिंग विभागात साहचर्य बैठक सोमवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडली. या बैठकीत विभागात शैक्षणिक आणि संशोधन उपक्रम विकसित करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

नागपूर शहरातील एआयएमएस, सीएसआयआर -निरी, आयसीएआर- सीसीआरआय, आयसीएआर- सीआयसीआर, एमजीआयएमएस वर्धा, एसएआय बायोसिस्टम्स, पीजीएनआयपीएम, एसडीकेएस डेंटल कॉलेज नागपूर आणि बुटीबोरी एमआयडीसी येथील केमिकल इंडस्ट्री आदी नामवंत राष्ट्रीय संशोधन संस्थासोबत शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात नवीन मार्ग शोधणे हा या बैठकीचा उद्देश आहे.

मॉलिक्युलर बायोलॉजि आणि जेनेटिक इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. डी. पी. गोगले यांनी बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविले. नागपुरातील संशोधन, शैक्षणिक संस्था, उद्योग आणि सरकारी संस्थांचे नामवंत अधिकारी बैठकीला उपस्थित होते. यामध्ये सीएसआयआर-नीरीचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. लाल सिंग, एसडीकेएस दंत महाविद्यालय नागपूर येथील बालरोगशास्त्र आणि प्रतिबंधात्मक दंतचिकित्सा विभाग प्रमुख डॉ. अरुण सज्जनार, साई-बायोसिस्टम्स प्रा. लि. चे संचालक डॉ. दिलीप गोरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय नागपूरचे सहायक प्राध्यापक डॉ. आर. सी. सावंत, बुटीबोरी एमआयडीसी मधील शास्त्रज्ञ डॉ. एच. एम. मेश्राम, आयसीएआर-सीसीआरआय नागपूरचे शास्त्रज्ञ डॉ. जे. पी. तेजकुमार, आयसीएआर-सीसीआरआयचे डॉ. एस. नंदेश्वर, एल.ए.डी. महिला महाविद्यालयातील माजी विभाग प्रमुख प्रो. एन. खुबाळकर व डॉ. मोहम्मद रिजवान यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात विभाग प्रमुख डॉ. डी. पी. गोगले व डॉ. मोहम्मद रिजवान यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. बैठकी दरम्यान संबंधित मान्यवरांनी अनेक मौल्यवान सूचना दिल्या ग्रामीण विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांमधील सॉफ्ट स्किल्स, लेखन कौशल्ये आणि संवाद कौशल्यांमधील अंतर भरून काढण्यासाठी कॉर्पोरेट संशोधन वातावरण निर्माण करण्याबाबत चर्चा करण्यात आली. विविध शास्त्रज्ञ उपस्थितांकडून सहकार्यात्मक मदत ही घेण्यात आली. विद्यार्थ्यांना अधिक सक्षम आणि कुशल बनवण्यासाठी त्यांची कौशल्ये वाढवणे. मेंटॉरशिप, प्रशिक्षण देण्यात आपली आवड आणि उत्साह दाखविला. विद्यार्थ्यांना प्लेसमेंट/इंटर्नशिप आणि इतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आणण्यासाठी बैठकीत एकूण १३ कार्यवाही करण्यायोग्य मुद्दे समोर आले. स्टार्टअपसाठी प्रक्रिया, नैतिक समित्यांची स्थापना, विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी नवीन पद्धती, उद्योजकीय संस्कृतीचा विकास या विषयावर चर्चा करण्यात आली. बैठकीला विविध क्षेत्रातील नामवंत शास्त्रज्ञ उपस्थित होते. यासोबतच सर्व कर्मचारी बैठकीला विभागाचे सदस्य उपस्थित होते.





## विद्यार्थी- शिक्षकांना नवी दृष्टी देणारे एनईपी
## अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी यांचे प्रतिपादन
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभागात चर्चासत्र

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना नवी दृष्टी देणारे आहे, असे प्रतिपादन विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ .प्रशांत माहेश्वरी यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभागाच्या वतीने विभागातील सभागृहात शनिवार, दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी 'NEP -2020 बी.ए .इतिहास अभ्यासक्रम' यावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. माहेश्वरी मार्गदर्शन करीत होते.

चर्चासत्राच्या उद्‌घाटन समारंभाचे अध्यक्ष डॉ.शामराव कोरेटी (अधिष्ठाता मानवविज्ञान विद्याशाखा) व प्रमुख अतिथी म्हणून डॉ.प्रशांत माहेश्वरी यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. माहेश्वरी यांनी नव्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांना अद्यावत होणे गरजेचे आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांकरिता विषय निवडण्यात अनेक पर्याय असल्यामुळे त्यांच्या आवडीनुसार शिकता येईल. त्यातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आणि बौद्धिक विकास घडून येईल असे प्रमुख अतिथींनी आपल्या भाषणात सांगितले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची आवश्यकता, देश पातळीवर त्याची अंमलबजावणी, नव्या धोरणातून निर्माण होणारी संधी, बदलत्या काळानुसार शैक्षणिक धोरणात सुद्धा बदल होणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शैक्षणिक क्षेत्रात नवे उपकरणे वापरण्यास सुरुवात झाली. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आज विद्यार्थी घरी बसून जगातल्या कुठल्याही विद्यापीठाची पदवी ऑनलाईन पद्धतीने पूर्ण करू शकतो. विद्यापीठाच्या प्रशासनात सुद्धा ऑनलाईन पद्धतीचा मोठ्या प्रमाणात समावेश करण्यात आला आहे. या सर्व बाबींचा विचार करून शिक्षकांनी स्वतः बदल घडवून आणायला हवा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विद्याशाखेतील विविध विषय घेण्याची मुभा असेल तसेच आंतरविद्या शाखेतील विषय सुद्धा निवडण्याची संधी त्याच्या जवळ असेल यावर प्रमुख अतिथींनी प्रकाश टाकला.

पहिल्या सत्रातील वक्ते डॉ. सतीश चापले यांनी प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा कशी समृद्ध होती वर्तमान काळात सुद्धा ती किती फायदेशीर आहे यावर भाष्य केले. डॉ. लोणारे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी.ए. च्या अभ्यासक्रमात झालेले बदल आणि परीक्षेचे स्वरूप याबाबत माहिती दिली. डॉ. हटवार यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि अडचणी त्यावरील उपाय योजना यावर भाष्य केले. सत्राध्यक्ष डॉ. मिश्रा मॅडम यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित असून प्राध्यापकांनी अद्यावत होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर बदललेल्या परिस्थितीनुसार ऑनलाइन पद्धतीचा जास्तीत जास्त वापर करावा असे आवाहन केले.

समारोपीय सत्रातील वक्ते डॉ. प्रियराज महेशकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व कौशल्य , रोजगाराच्या संध्या उपलब्ध होतील, त्यानुसार अभ्यासक्रम तयार केले आहे असे मत मांडले. डॉ. प्रज्ञा कामडी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थीभिमुख आहे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारे आहे. तसेच प्राध्यापकांनी अनेक नव्या गोष्टी शिकून अद्यावत व्हावे असे आवाहन केले. या सत्राचे अध्यक्ष अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे स्वरूप आणि अंमलबजावणी यावर भाष्य केले. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू ठरवून अभ्यासक्रम निर्माण करण्यात आला तसेच शिक्षकांना अभ्यासक्रम हाताळताना कुठलीही अडचण जाणार नाही याची दक्षता सुद्धा घेण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहे, नव्या टेक्नॉलॉजी चा जास्तीत जास्त वापर करून घ्यावा, तसेच ऑनलाईन पद्धतीचा जास्त वापर करावा. आजच्या काळातील विद्यार्थी आणि शिक्षक हे टेक्नोसॅव्ही असावे असे प्रतिपादन केले. चर्चासत्राचे संचालन डॉ.रामभाऊ कोरेकर यांनी केले, प्रास्ताविक डॉ.गोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.प्रदीप चव्हाण यांनी मानले.



## मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ३७ लाभार्थ्यांना नियुक्ती आदेश

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भरती मोहिम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत ३७ लाभार्थ्यांना माननीय कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या शुभहस्ते नियुक्ती आदेश शुक्रवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी देण्यात आले. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील ग्रामगीता भवनात एकूण ५६ पदांच्या इंटर्नशिप करिता ही भरती मोहीम जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहकार्याने राबविण्यात आली.

महाराष्ट्र शासनाने बेरोजगार युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण मिळावे, त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढवी यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यास मान्यता दिली आहे. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने' अंतर्गत या भरती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. भरती प्रक्रिये दरम्यान मुलाखतीनंतर अध्यापन सहाय्यक पदाकरीता १५, कार्यालय सहाय्यक (गट क) १७ तर कार्यालय सहाय्यक (गट ड) करीता ५ अशी एकूण ३७ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना माननीय कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या शुभहस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले. यावेळी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुनंदा बजाज, विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने अध्यापन सहाय्यक, कार्यालय सहाय्यक (गट क पद), कार्यालय सहाय्यक (गट ड पद) या पदाकरिता ही भरती मोहीम राबविली. यामध्ये अध्यापन सहाय्यकांची १८ पदे, कार्यालय सहाय्यक (गट क) २४ तर कार्यालय सहाय्यक (गट ड) ची १४ पदे भरावयाची होती. विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांकरीता इंटर्नशिप/ऑन जॉब ट्रेनिंग कार्यक्रम असल्याने येथील विद्यार्थ्यांना यात प्राधान्यक्रम देण्यात आले. अध्यापन सहाय्यक पदाकरीता २२, कार्यालय सहाय्यक (गट क) २५ तर कार्यालय सहाय्यक (गट ड) करीता २५ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखत दिली. सदर उमेदवारांचे मुलाखती घेवून कागदपत्राची तपासणी करण्यात आली. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना सहा महिन्यासाठी ६०००/-, ८०००/- व १०,०००/- रुपये विद्यावेतन अदा करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत भरती मोहीम यशस्वी करण्याकरिता विद्यापीठातील अनिकेत गभणे, आशिष गावंडे, प्रितेश शिरसुद्धे, चेतन मानकर, राजेश गुप्ता यांनी सहकार्य केले.



## पीजीटीडी शारीरिक शिक्षण विभागात वृक्षारोपण

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पीजीटीडी शारीरिक शिक्षण विभागात वृक्षारोपण करण्यात आले. शारीरिक शिक्षण विभागामध्ये विद्यार्थ्यांना पर्यावरण जागृती व्हावी या हेतूने वृक्षारोपण करून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्या वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी दिली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. विशाखा जोशी उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. वर्षा बोरीटकर व वसंतराव नाईक शारीरिक सहाय्यक प्रा. डॉ. सुरेखा धात्रट यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या समन्वयक डॉ. माधवी मार्डीकर यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धन आणि पर्यावरणाच्या समतोल कसा राखायचा याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कु. सायली वाघमारे (द्वितीय वर्ष) हिने केले तर आभार कु. मिताली पाटील हिने मानले. कार्यक्रमाला शारीरिक शिक्षण विभागाचे प्रा. डॉ. रजनी मुरकुटे, डॉ. सुनील कापगते, डॉ. अंकुश घाटे, वृषाली देशमुख, लॉलडन टोनियत, शुभम सैनी, रोशनी खोब्रागडे, जसबीर सिंग, निकिता विश्नोई, श्रीनिवास लांबघरे हे उपस्थित होते.





## ललित कला विभागात प्लेसमेंट ड्राईव्ह
### विद्यापीठ प्रशिक्षण व रोजगार विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला व छंद मंदिर विभागात मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला. महालक्ष्मी जगदंबा महाविद्यालयातील पदांकरिता हा प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आला.

नागपूर येथील महालक्ष्मी जगदंबा महाविद्यालयाकडून ललित कला शाखेतील सहाय्यक प्राध्यापक तसेच कला शिक्षक या पदाकरिता मुलाखती आयोजित करण्यात आल्या. यावेळी माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली ललित कला व छंद मंदिर विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात, महालक्ष्मी जगदंबा महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अनिता उदय टेकाडे, विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. महालक्ष्मी जगदंबा महाविद्यालयाने सहाय्यक प्राध्यापकांची २ पदे व कला शिक्षकाच्या एका पदाकरिता हा प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित केला. या पदाकरिता दहा विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. महालक्ष्मी जगदंबा महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अनिता उदय टेकाडे यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.



## एम.एससी. भूगोल अभ्यासक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाने आपल्या हिरक जयंती आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शंभराव्या वर्धापन दिनानिमित्त नवीन एम.एससी. भूगोल अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमाची पहिली बॅच नुकताच उत्तीर्ण झाली आहे. पहिल्या बॅचची विद्यार्थिनी प्रणिता काळेने पहिल्या प्रयत्नात सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. इतर सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण किंवा उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात नियुक्ती मिळाली आहे.

भूगर्भशास्त्र विभाग हा भूगोल (विज्ञान विभाग) विषयात पीएचडीसाठी मान्यता प्राप्त संशोधन केंद्र आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना यात पीएचडीसाठी प्रवेश घेता येतो. विज्ञान शाखेतील कोणताही पदवीधर या अभ्यासक्रमासाठी पात्र आहे. याशिवाय, पदवीच्या शिक्षणात भूगोल हा एक विषय असलेल्या कोणत्याही उमेदवारासाठीही हा अभ्यासक्रम खुला आहे. हा अभ्यासक्रम रोजगार-आधारित असून विविध व्यावसायिक क्षेत्रात कामाची संधी उपलब्ध आहे. या अभ्यासक्रमाबाबत अधिक माहिती मिळवण्यासाठी भूगर्भशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. किर्तिकुमार राणदिवे यांच्याशी ९८५०८२७१५१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.







## पदव्यूत्तर विधी विभागात माजी विद्यार्थी मेळावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १०१ वा वर्धापन दिन तसेच शताब्दी महोत्सव समापन समारोहाच्या निमित्ताने पदव्युत्तर विधी विभागात शनिवार, दिनांक ३ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी २.३० वाजता विभागाच्या कार्यालयात माजी विद्यार्थ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीला भारतभरातील ६० हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली. त्याचबरोबर पीजीटीडी एलएलएम विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी देखील या कार्यक्रमात भाग घेतला. माजी विभाग प्रमुख डॉ. थ्रिटी पटेल, माननीय न्यायाधीश आर.सी. चव्हाण (सेवानिवृत्त), विशाखापट्टणम येथील दामोदरम राष्ट्रीय कायदा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सूर्यप्रकाश राव, मुंबई विद्यापीठाचे माजी विभाग प्रमुख ॲडव्होकेट (डॉ.) अशोक येडे, सरकारी कायदा महाविद्यालय मुंबईच्या प्राचार्य डॉ. अस्मिता वैद्य, वंजारी कायदा महाविद्यालय प्राचार्य डॉ. स्नेहल फडणवीस आणि इतर मान्यवर या कार्यक्रमात उपस्थित होते.

सर्वांशी संवाद साधताना विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने माजी विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेवर आणि कायदा क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकला. विभागाच्या प्रगतीसाठी त्यांच्या योगदानाची प्रशंसा केली. या बैठकीला देशभरातून विविध काळातील माजी विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. कार्यक्रमातील सर्वात भावनिक क्षण म्हणजे माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या जुने वर्गखोल्या आणि परिसराची फेरफटका मारला. त्यांच्या पोस्ट ग्रॅज्युएट काळाची आठवण ताजी केली. फेरफटकेनंतर, माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या जुने मित्र आणि शिक्षकांशी चहा घेत पुनः कनेक्ट होण्याची संधी मिळाल्याने आनंद व्यक्त केला. विभागाच्या वेळेस त्यांच्या अनुभवांची आणि आठवणींची देवाणघेवाण करताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह पाहणे हृदयस्पर्शी होते. कार्यक्रम माजी विद्यार्थ्यांसाठी जुने मित्र भेटण्याची, एकमेकांशी नेटवर्किंग करण्याची आणि नवीन कनेक्शन तयार करण्याची एक उत्तम संधी होती. या कार्यक्रमाने विभाग आणि माजी विद्यार्थ्यांमधील मजबूत संबंधांना दृढ केले आहे. पीजीटीडी लॉ आरटीएमएनयूच्या माजी विद्यार्थ्यांनी विभागाच्या विविध शैक्षणिक क्रियाकलापांमध्ये आणि विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटमध्ये सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. विजयता उइके, शिखा गुप्ता, ऋचा कोचर, पद्मा चौबे, शिवानी खंडाटे, तारिक खान आणि विभागातील विद्यार्थ्यांनी काम पाहिले.

## प्रवास व पर्यटन विभागात इंडक्शन कार्यक्रम





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता सोमवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नवीन विद्यार्थ्यांना विभागाची ओळख, अभ्यासक्रम, संपूर्ण शैक्षणिक वर्षात राबविल्या जाणारे विभागीय कार्य याची माहिती देण्यात आली. तसेच पदवी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांना शैक्षणिक सहल, दीर्घ सहलीचा अनुभव, जागतीक पर्यटन दिवस, राष्ट्रीय पर्यटन दिवस आणि विभागातील मागच्या वर्षाचा शैक्षणिक प्रवास पीपीटीद्वारे सांगितला. विभागातील शिक्षकांनी पर्यटन विषयावरील माहितीपर प्रश्नमंजुषा आयोजित केली होती. विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना विभागीय माहिती आणि प्रवास व पर्यटन विषयाचे महत्व सांगून त्यांना संबोधित केले. या कार्यक्रमाचे संचालन आफ्रीन अन्सारी या विद्यार्थिनीने केले. संगणक हाताळणी खुशी कांबळे हिने केली तर आभार जयंत साठे यांनी मानले. कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता आदित्य झाडे, रामदास बागडे, दीपक उके, नरेश मेश्राम या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. डॉ. अरविंद उपासनी, डॉ. अमरदिप बारसागडे, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. परिमल सुरडकर, प्रा. शोभना मेश्राम यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.




## पदव्युत्तर तत्त्वज्ञान विभागात परिसंवाद संपन्न

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर तत्त्वज्ञान विभागात रुचिर शर्मा लिखित “What Went Wrong With Capitalism” या प्रसिद्ध पुस्तकावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. विदर्भ अर्थशास्त्र परिषद आणि पदव्युत्तर तत्त्वज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. ८ ऑगस्ट २०२४ रोजी परिसंवाद पार पडला.

या परिसंवादात प्रमुख वक्ता म्हणून सोलापूर विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस व अध्यक्ष म्हणून जेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले उपस्थित होते. तत्त्वज्ञान विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख डॉ. धीरज कदम यांनी आपल्या प्रास्ताविकेत या परिसंवादाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करण्यासोबतच विदर्भ अर्थशास्त्र परिषद व तत्त्वज्ञान विभाग यांच्या वाटचालीचा आढावा उपस्थितांपुढे प्रस्तुत केला. परिसंवादाच्या प्रमुख वक्त्या डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी रुचिर शर्मा यांच्या पुस्तकाचे अंतरंग उलघडून दाखविले. शर्मा यांच्या पुस्तकातील विविध दाखले देत, आज भांडवलशाहीचे बदलत चाललेले स्वरूप व आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेत नव्याने ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्याचा त्यांनी उहापोह केला. त्यामध्ये विविध देशांमध्ये सरकारचा, राजकीय हेतूने प्रेरित कल्याणकारी योजनांवरचा वाढता खर्च व त्यामुळे वाढत चाललेले सार्वजनिक कर्ज; सातत्याने व्याजदर कमी ठेवण्याचे धोरण, त्यातून शेअर व भांडवल बाजारात निर्माण होणारे बुडबुडे, आणि त्यातून निर्माण झालेली अस्थिरता; झोंबी फर्म्स; प्रचंड वाढत्या विषमता यासारख्या समस्यांची चिकित्सा केली.

डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात, रुचिर शर्मा यांनी त्यांच्या पुस्तकात चर्चिलेले भांडवलशाहीतील प्रश्न हे मुळात त्या व्यवस्थेशी जुळलेले प्रश्न असून त्याचे शाश्वत समाधान त्या चौकटीत सापडणे शक्य नसल्याचे प्रतिपादन केले. त्यामुळेच शर्मा केवळ प्रश्न उपस्थित करतात. परंतु त्यावरील उपाय सांगत नाहीत, अशी टीकात्मक टिप्पणीही त्यांनी केली. भांडवलशाहीतील या समस्यांमुळेच जगभरात त्याबद्दलचा असंतोष वाढत असल्याचे देखील त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्र-संचालन कु. धनश्री पात्रीकर यांनी, तर आभार विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. एच. ए. हुद्दा यांनी मानले. या कार्यक्रमाला तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. सुरेंद्र गायधने, राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विकास जांभूळकर, अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. आर. वाय. माहोरे, डॉ. अंजली कुलकर्णी, शेतकरी नेते श्री. विजय जावंधिया, विद्यापीठाच्या विविध विभागातील विभागप्रमुख, तसेच तत्त्वज्ञान व अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.





## भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ऑगस्ट क्रांती महत्त्वपूर्ण

### डॉ. विनोद कामडी यांचे प्रतिपादन

### पदव्युत्तर इतिहास विभागात “ऑगस्ट क्रांती दिन"

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ऑगस्ट क्रांतीच्या लढ्याला विशेष महत्त्व असल्याचे प्रतिपादन डॉ. विनोद कामडी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभागात क्रांती दिन कार्यक्रम गुरुवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कामडी मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता तथा इतिहास विभाग प्रमुख डॉ. शामराव कोरेटी होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विनोद कामडी यांची उपस्थिती होती.पुढे मार्गदर्शन करताना डॉ. कामडी यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनादरम्यान १९३० ते १९४७ हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा होता, असे सांगितले. याच काळात जगात अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आणि त्याचाच परिणाम आपल्या

देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनावर झाला. तसेच डॉ. कामडी यांनी क्रांती दिनानिमित्त १९४२ च्या घटनाक्रमाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. १८५७ च्या राष्ट्रीय उठावानंतर साम्राज्यवादाविरोधात एक लहर निर्माण झाली. काँग्रेसच्या स्थापनेनंतर स्वातंत्र्याच्या चळवळीला एक व्यासपीठ निर्माण झाले. पुढे काँग्रेसच्या माध्यमातून स्वातंत्र्याच्या चळवळीला एक व्यापक स्वरूप प्रदान झाले. याच काळातील आंतरराष्ट्रीय घडामोडींचा सुद्धा भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर व्यापक प्रमाणात परिणाम झालेला दिसून येतो, डॉ. कामडी म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ शामराव कोरेटी यांनी आपल्या भाषणात १९४२ ची क्रांती अत्यंत व्यापक स्वरूपाची होती. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न झाले. त्यात काँग्रेस मवाळवादी, जहाल गट, क्रांतिकारी गट विशेषतः सुभाष चंद्र बोस, अशा क्रांतिकारी नेतृत्वामुळे सुद्धा भारतीय स्वातंत्र्याला हातभार लागल्याचे दिसून येते असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अशोक नैताम यांनी केले. संचालन द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु.आकांक्षा बनसोड हिने केले तर आभार अभिषेक पाटील यांनी मानले.



## पदव्युत्तर विधी विभागात स्वागताचा अभिनव कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विधी विभागात ( स्वायत्त) २०२४-२६ बॅचच्या प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी अभिनव कार्यक्रम घेण्यात आला. विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, दिनांक ९ आणि शनिवार, १० ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले.

दोन दिवसीय कार्यक्रमांमध्ये आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, ललित कला व छंद मंदिर विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात, पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमांमध्ये नवीन बॅचच्या पदव्युत्तर विधी विद्यार्थ्यांचे स्वागत व ओळख करून देण्यात आली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्कृती व मूल्ये समजून घेण्यासाठी, तसेच त्यांच्या कायदेशीर शिक्षणाच्या प्रारंभासाठी उपलब्ध संसाधनांची आणि संधींची माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटन भाषणात विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी कायदेशीर व्यवसायामध्ये अखंडता, विचारशक्ती आणि नैतिक आधाराचे महत्त्व सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना विभागात त्यांचा वेळ उत्कृष्टपणे वापरून शैक्षणिक आणि सहशालेय क्षेत्रांमध्ये सहभागी होण्याकरिता प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक तसेच वैयक्तिक विकासावर लक्ष केंद्रित करीत, पहिल्या दिवशी पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर यांनी 'प्रोफेशनलसाठी स्ट्रेस मॅनेजमेंट', डॉ. संयुक्ता थोरात यांनी 'थेरपी विथ थिएटर गेम्स टू ओव्हरकम लाईफ प्रॉब्लेम्स', आणि श्रीमती शिखा गुप्ता यांनी 'अँटी-रॅगिंग' यावर सत्रे घेत माहिती दिली. दुसऱ्या दिवशी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुलकर यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आधुनिक संदर्भ, अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी 'गांधीवादी तत्त्वज्ञान आणि वकिलांसाठी त्याचा संदर्भ', आणि डॉ. विजयलक्ष्मी थोटे यांनी 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा आपल्या जीवनात संदर्भ' यावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांच्या पदव्युत्तर शैक्षणिक प्रवासाच्या प्रारंभाच्या व्यापक ओळखीबद्दल कौतुक केले. अनेकांनी नमूद केले की अभिनव कार्यक्रमाने त्यांच्या प्रारंभिक चिंतेला कमी केले आणि पुढील वर्षांसाठी स्पष्ट मार्गदर्शक दिला. या कार्यक्रमाचे आयोजन आणि समन्वयक एम. शिवानी खंडाटे, डॉ. विजयता उईके आणि पीजीटीडी विधी विभागाच्या इतर प्राध्यापकांनी केले.






## तुलसीदास समाजाचे आदर्श द्रष्टे - डॉ. मिथिलेश अवस्थी यांचे प्रतिपादन

### विद्यापीठाच्या हिंदी विभागात तुलसीदास जयंती

प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरित्रातून गोस्वामी तुलसीदासांनी समाजात विवेक, मर्यादा आणि धर्माचे पालन करण्याचा आदर्श मांडला. खरे तर तुलसीदास हे आदर्श समाजाचे द्रष्टे होते, असे प्रतिपादन पी. डब्ल्यू. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे माजी हिंदी विभाग प्रमुख व नगरचे प्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत डॉ. मिथिलेश अवस्थी यांनी येथे केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागातर्फे गोस्वामी तुलसीदास जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते संबोधित करीत होते.

व्यासपीठावर हिंदी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिन्हे उपस्थित होते. रामचरितमानस या ग्रंथाला जास्त वाचकसंख्या आहे. तुलसीदासांनी रामचरितमानस मधील विविध प्रसंग आणि संवादातून लोकांच्या जीवनात प्रतिष्ठा, विनयशीलता, नम्रता, शौर्य, साधेपणा आणि भक्ती या मूल्यांचे पालनपोषण केले, असे उद्गार डॉ. अवस्थी यांनी काढले. तुलसीदास यांची कविता लोककविता आहे. सार्वजनिक जीवनाचे उच्च आदर्श त्यात प्रस्थापित झाले आहेत. लोकजीवनाच्या विविध छटा त्यांच्या साहित्यात आहेत, असे प्रास्ताविक करताना डॉ. गिन्हे म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. सुमित सिंग यांनी मानले. याप्रसंगी आयकर विभागाचे राजभाषा सहायक संचालक अनिल त्रिपाठी, साहित्यिक संतोष सिंग 'बादल', डॉ. एकादशी जैतवार, जागृती सिंग, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. विनय उपाध्याय, ज्ञानेश्वर भेलकर, आकांक्षा बांगर यांच्यासह अनेक संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.





## प्रवास व पर्यटन विभागात माजी विद्यार्थी मेळावा

### शिक्षक सभेसह वृक्षारोपण कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागात माजी विद्यार्थी मेळावा, पालक - शिक्षक सभा आणि वृक्षारोपण कार्यक्रम शनिवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमाला शैलेश अंबोरकर, डॉ. अरविंद उपासनी परिमल सुरडकर, मनोज वाहने आणि छलिया कोटांगले ही माजी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात माजी विद्यार्थी यांनी विभागाच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना पर्यटन क्षेत्रातील उपलब्ध असलेल्या संधी, त्यांची क्षेत्रातील प्रगती, शैक्षणिक सहलीचा अनुभव, विविध ट्रॅव्हल एक्स्पो, प्रवास व पर्यटन विषयाच्या विद्यार्थ्यांचा इतिहास आणि भूगोल विषय पक्का असावा तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या लाभ घेऊन स्वतःचा विकास करावा असे आपल्या संबोधनात सांगितले.

पदवी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक लघु आणि दीर्घ सहलीचा अनुभव तसेच शिक्षण घेतांना आलेल्या अनुभवाची माहिती पदवी भाग एक च्या विद्यार्थ्यांना दिली. विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पालकांशी संवाद साधतांना प्रवास व पर्यटन विभागाचा इतिहास, शैक्षणिक सत्र राबवित असताना विद्यार्थ्यांना समोर येणारी विविध आव्हाने, शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी जाण्याची अनिवार्यता या बद्दल पालकांना माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवासाच्या शुभेच्छा दिल्यात. विभागाच्या परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम करून नवीन झाडे लावण्यात आली. या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता रामदास बागडे, दीपक उके, नरेश मेश्राम, जयंत साठे या विद्यार्थ्यांनी हातभार लावला. तसेच डॉ. अरविंद उपासनी, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. परिमल सुरडकर, प्रा. मनोज वाहाने यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.





## पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात परिचय कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक प्राणीशास्त्र विभागात विद्यार्थी परिचय कार्यक्रम मंगळवार, दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. विभागातील सेमिनार हॉलमध्ये एमएससी सेमिस्टर १ च्या विद्यार्थ्यांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राणीशास्त्र विभागात नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना विभाग, विभागामधील संसाधने त्याचप्रमाणे भविष्यातील करिअरच्या संधींबाबत माहिती व्हावी याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विभागप्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन करून विभागाबाबत संपूर्ण माहिती दिली. प्राणीशास्त्र विभागाचा इतिहास, शैक्षणिक आणि संशोधन सुविधा, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेली संसाधने याबाबत प्रकाश टाकला. विभागात विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे याची वचनबद्धता डॉ. धुर्वे यांनी दर्शविली. विद्यार्थ्यांनी देखील विभागाकडून आयोजित विविध कार्यक्रम स्पर्धांमध्ये सहभाग घेत शिस्तीचे पालन करणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. एस. सी. मसराम यांनी पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर करिअर संबंधी विविध क्षेत्राविषयी माहिती दिली. प्राणीशास्त्र विभागातून पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या संधी, संशोधनपदे, अध्यापन भूमिका, सरकारी, संरक्षण व पर्यावरण संस्थांमधील नोकऱ्यांबाबत माहिती दिली. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान रोजगार, बाजार आवश्यक कौशल्य आणि विविध स्पर्धा परीक्षांवरील माहिती याविषयी चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमात एमएस्सी सेमिस्टर १ च्या सर्व विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि संशोधन शिष्यांनी सहभाग घेतला. एकूणच, या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना विभागाच्या वातावरणाची प्रभावी ओळख करून दिली आणि त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासाचे नियोजन कसे करावे याबद्दल महत्त्वपूर्ण माहिती प्रदान केली.





## निश्चित ध्येयाचा पाठपुरावा केला तरच हमखास यश
### डॉ. सुरेश जाधव यांचे प्रतिपादन
### पदव्युत्तर इतिहास विभागात इंडक्शन कार्यक्रमात व्याख्यान

आपले ध्येय निश्चित करून विद्यार्थ्यांनी त्याचा सतत पाठपुरावा केला तरच हमखास यश त्यांच्या पदरात पडू शकते, असे प्रतिपादन प्रीमियर अकॅडमी प्रशासकीय सेवा नागपूरचे डॉ.सुरेश जाधव यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभागात बुधवार दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी एम.ए. प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता परिचय कार्यक्रम व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. जाधव बोलत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान इतिहास विभाग प्रमुख तथा मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून प्रीमियर अकॅडमी प्रशासकीय सेवा नागपूरचे डॉ.सुरेश जाधव यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. जाधव यांनी निरंतर अभ्यासच विद्यार्थ्यांना यशा जवळ पोहोचू शकते, असे सांगितले. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या दैनंदिनीत सातत्य ठेवणे फार गरजेचे आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. आज ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेकडे मोठ्या प्रमाणात वळला आहे. त्यांना जर

योग्य मार्गदर्शन आणि प्रमाणित पुस्तके मिळाली तर ते यशस्वी होऊ शकतात. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी रोज एक वर्तमानपत्र नियमित वाचायला हवे. अहोरात्र मेहनत करण्यापेक्षा निश्चित उद्देश्य प्राप्ती साठी आवश्यक प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे असे डॉ. जाधव म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शामराव कोरेटी यांनी इतिहास विभागाच्या स्थापनेबाबत तसेच अभ्यासक्रम, विभागात शिकविले जाणारे विषय, वर्षभर चालणाऱ्या व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रम याबाबत सविस्तर माहिती दिली. याशिवाय परीक्षा, मूल्यांकन, अंतर्गत गुणांकन यावरही भाष्य केले. विभागातील प्राध्यापकांनी शिकवीत असलेल्या विषयाची माहिती तसेच स्वतःचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रदीप चव्हाण यांनी केले तर आभार डॉ. रामभाऊ कोरेकर यांनी मानले.

## इतिहास माहीत असलेले अधिक प्रेरणेने काम करतात

### डॉ. सविता सावरकर यांचे प्रतिपादन

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात व्याख्यान

इतिहास माहीत असलेले अधिक प्रेरणेने काम करतात, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सुनीता सावरकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागातर्फे 'ढोर-चांभार महिलांचा आंबेडकरी चळवळीतील सहभाग व सद्यस्थिती' या विषयावर शुक्रवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी व्याख्यान पार पडले. यावेळी डॉ. सावरकर मार्गदर्शन करीत होत्या.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषविले तर व्याख्याता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या






इतिहास विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सुनीता सावरकर यांची उपस्थिती होती. ढोर-चांभार समाजातील महिलांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरी चळवळीतील योगदानाबाबत चर्चा करताना डॉ. सविता सावरकर म्हणाल्या की, समाजाला एकत्र आणण्याच्या मुद्द्यांवर जास्तीत जास्त चर्चा केली पाहिजे. दोन व्यक्तींमधील संमतीचा पुरावा ५०-५० टक्के असणे आवश्यक नाही. समाजालाही समजून घेणं गरजेचं आहे. या प्रक्रियेत आपण कमी पडत आहोत. ही वस्तुस्थिती सांगणे महत्त्वाचे आहे, ढोर-चांभार समाजाला त्याचा इतिहास माहीत नाही. त्यांच्यापर्यंत वस्तुस्थिती पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या. या समाजाने कालांतराने आपले योगदान दिले आहे. त्यांच्या आंदोलनात ढोर-चांभार समाजातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपुरात घेतलेल्या महिला परिषदेच्या अध्यक्षस्थानी चांभार समाजाच्या गुणाबाई गाडेकर (वाघमारे) होत्या. त्यावेळी काही मर्यादा होत्या, तरीही त्या मर्यादा झुगारून गुणाबाईंनी चळवळीची धुरा सांभाळली. ढोर समाजाच्या सावित्रीबाई बोराडे यांनीही सहकार्य केले. बहिष्कृत भारतामध्ये सावित्रीबाई बोराडे यांच्यासह दोन महिलांचा उल्लेख आढळतो. शिवतरकर घराण्यातील वेणूबाईंचा उल्लेख जनता वृत्तपत्रात येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीचे अडथळे तोडण्यासाठी सहभोजनची सुरुवात केली होती. ज्यावेळी शिवतरकरांच्या घरी सहभोजनचा कार्यक्रम सुरू होता, त्याचवेळी शिवतरकर यांच्यावर बहिष्कार टाकण्यासाठी घराबाहेर चमार कामगार समाजाची बैठक सुरू होती. अनुसया शिवतरकर यांनी आंबेडकरी चळवळीसाठी आपले दागिने गहाण ठेवले होते. ही बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कळताच त्यांनी शिवतरकर यांना सोडवण्यासाठी पैसे दिले, असे त्या म्हणाल्या. पी. एन. राजभोज यांच्या पत्नी रुक्मिणी व मुलगी शांताबाई राजभोज यांचा आंदोलनात उल्लेख आढळतो. शांताबाई तुरुंगातही गेल्या होत्या.

बौद्ध धर्मात दीक्षा घेण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजभोज यांच्या एका मुलाचे नाव बौद्ध परंपरेच्या आधारे ठेवले होते. या चळवळीत रामरतन जानोरकर यांच्या कुटुंबाचे मोठे योगदान आहे. रमाबाई आंबेडकर आणि बेळगावातील चांभार समाजातील महिलांचे वेगळे नाते होते. दोघांनाही एकमेकांची भाषा समजण्यात अडचणी आल्या, पण वैचारिकदृष्ट्या ते एक होते असे त्यांनी सांगितले. दलित पँथर चळवळीतही अनेक महिलांचा उल्लेख आहे. आमची चूक एवढीच आहे की आम्ही त्याचे दस्तऐवजीकरण करू शकलो नाही. हे सर्व पूर्वी सक्रिय होते, परंतु आता नाही. आम्ही त्यांना नंतर प्रतिसाद दिला नाही. आम्ही त्यांना एकत्र ठेवू शकलो नाही. इतर समाजाने त्याला स्वीकारले नाही. याचा परिणाम कुटुंबावर आणि नंतर समाजावर होतो. तो हळू हळू निघून जातो. समाज एकत्र कसा येईल यावर बोलायला हवे. समाज संघटित करण्यावर चर्चा व्हायला हवी. ही वस्तुस्थिती त्यांच्यापर्यंत पोहोचवावी लागेल, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अविनाश फुलझेले यांनी महार, ढोर, चांभार समाजाचे नाते विशद करताना सांगितले की, प्रत्येक वेळी हा समाज तोडण्याचा प्रयत्न झाला, जो आजही सुरू आहे. संचालन स्मिता शेंडे यांनी केले तर आभार भीमराव फुसे यांनी मानले.



## प्रवास व पर्यटन विभागात लघु शैक्षणिक सहल
### विद्यापीठ प्रवास व पर्यटन विभागाचे आयोजन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी लघु शैक्षणिक सहलीचे आयोजन बुधवार, दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले.

या सहलीत बोर येथील व्याघ्र प्रकल्प, विपश्यना केंद्र, एमटीडीसी रिझोर्ट, पवनार येथील विनोबा भावे आश्रम व पवनारचा किल्ला तसेच महात्मा गांधी आश्रम सेवाग्राम आणि विश्वशांती स्तूप वर्धा या विदर्भातील प्रेक्षणीय आणि वारसा स्थळांना भेट देण्यात आली. या शैक्षणिक सहलीद्वारे टुरिझमच्या विद्यार्थ्यांनी एक दिवसीय सहलीचे नियोजन स्वतः केले. हे करत असताना टूर मॅप बनविणे, बस शोधने, प्रवास खर्च काढणे, प्रेक्षणीय स्थळांची माहिती सांगणे असे विविध कार्य केले. हा त्यांच्या अभ्यासक्रमाच्या भाग असून या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना एक यशस्वी टूर मॅनेजर बनण्यास मदत मिळेल. लघु शैक्षणिक सहल यशस्वी करण्याकरिता पदवी भाग १ आणि भाग २ च्या विद्यार्थ्यांनी योगदान दिले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शि खोब्रागडे, डॉ. अरविंद उपासनी आणि प्रा. शोभना मेश्राम, प्रा. मनोज वहाने यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.



## पेंच येथील वन्यजीव पर्यटन' विषयावर व्याख्यान
### विद्यापीठ प्रवास व पर्यटन विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागात " पेंच येथील वन्यजीव पर्यटन" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. पेंच व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ला यांनी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उपसंचालक डॉ. प्रभूनाथ शुक्ला यांनी आपल्या अतिथी व्याख्यानात पेंच व्याघ्र प्रकल्पाची स्थापना, वन्यजीव संबंधीत शासकीय मार्गदर्शक तत्वे, वन्यजीव संरक्षण कायदे, पेंच प्रकल्पात जाण्याचे विविध प्रवेशद्वार, उपलब्ध सुविधा, व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन सुरळीत चालावितांना येणारी आव्हाने आणि उपक्रम याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. पेंच येथे सध्या राबत असलेली व्याख्यान केंद्रे, विविध समुदाय विकास योजना आणि वन्यजीव क्षेत्रात उपलब्ध रोजगार संधी यांची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या विदर्भातील व्याघ्र प्रकल्पाशी संबंधीत प्रश्नांची योग्य उत्तरे दिली.

विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी वक्त्यांचे स्वागत केले आणि आपल्या अध्यक्षीय भाषणात या प्रमुख वक्त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या विदर्भातील व्याघ्र प्रकल्पाशी संबंधीत लघु आणि दीर्घ शोध प्रकल्पात मोलाची सहायता मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे संचालन दीपक उके यांनी तर आभार नरेश मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता डॉ. अरविंद उपासनी, डॉ. अमरदीप बारसागडे, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. परिमल सुराडकर, प्रा. मनोज वाहने आणि पदवी प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी रामदास बागडे, जयंत साठे, खुशी कांबळे, आफ्रिन अन्सारी, भूमिका गावंडे, यश डोमकावळे, पूजा बागडे, काजल चालुरकर, अभिषेक नाथ, विवेक कांबळे, करुणा ढोणे यांनी महत्वाची भूमिका बजावली.




## प्राणीशास्त्र विभागात लेखन कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात शुक्रवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ग्रंथालय आणि माहिती विज्ञान विभागाच्या प्राध्यापिका डॉ. शालिनी लिहितकर यांनी "लेख कसा लिहावा" या विषयावर विचारशील अतिथी व्याख्यान दिले.

प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही.टी. धुर्वे यांनी अतिथींचे स्वागत केले, तर प्राध्यापक डॉ. एस. सी. मसराम यांनी त्यांचा सत्कार केला. विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रभावी आणि सुवर्णरूपात लेखन कसे करावे याचे मार्गदर्शन करणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता. डॉ. लिहितकर यांनी लेख लिहिण्याचे स्पष्ट उद्दिष्ट असणे किती महत्त्वाचे आहे हे नमूद केले. लेखाच्या सामग्रीसाठी आणि संरचनेसाठी आधारभूत असलेल्या लक्षित प्रेक्षक आणि मुख्य संदेशाची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली. व्याख्यानात लेखाच्या आवश्यक घटकांचे वर्णन करण्यात आले. यामध्ये शीर्षक, सारांश, प्रस्तावना, पद्धती, परिणाम, चर्चा, निष्कर्ष, संदर्भ स्पष्ट आणि संक्षिप्त लेखनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी शब्दजाल टाळण्याचे, सुसंगतता सुनिश्चित करण्याचे, आणि माहितीच्या तार्किक प्रवाह राखण्याच्या टिप्स दिले. मसुद्यांचे पुनरावलोकन आणि संपादनाचे महत्व सांगितले, लेखाच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी सहकाऱ्यांच्या पुनरावलोकनाची शिफारस डॉ. लिहितकर यांनी केली.

योग्य जर्नल किंवा प्लॅटफॉर्म निवडणे आणि सादर करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे हा लेखन प्रक्रियेतील व्यावहारिक बाजूंचाही समावेश डॉ. शालिनी लहितकर यांनी समजावून सांगितले. त्यांनी व्याख्यानात प्रभावी लेखन प्रक्रियेवरील महत्वाची माहिती प्रदान केली. लेखन कौशल्य वाढवण्यासाठी प्रभावी साधने जसे झोटेरो, एक ओपन-सोर्स संदर्भ व्यवस्थापन सॉफ्टवेअर आणि प्लेजियरीझम चेकर यांचा उपयोग कसा करावा यावर त्यांनी प्रकाश टाकला. एमएससी विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रयत्नात फायदा होईल, असे अपेक्षित आहे. उपस्थितांनी डॉ. लहितकर यांच्या तज्ञतेचे आणि सादरीकरणाच्या व्यापकतेचे कौतुक केले. व्याख्यानाशी संबंधित काही प्रश्न चर्चा केली. हर्षदा पवार यांनी आभार मानले.

## लेखन कौशल्यातून विद्यार्थी स्वावलंबी होतील - डॉ. शामराव कोरेटी






लेखन कौशल्यातून विद्यार्थी स्वावलंबी होतील, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी केले. विद्यापीठ हिंदी विभागातर्फे आयोजित दोन दिवसीय 'मीडिया लेखन कार्यशाळे'च्या उद्घाटन सत्रात शुक्रवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी डॉ. कोरेटी मार्गदर्शन करीत होते.

भाषेच्या विद्यार्थ्यांसाठी लेखन कौशल्य आवश्यक असल्याचे पुढे सांगत कौशल्य विकासाचा हा काळ असल्याचे डॉ. कोरेटी म्हणाले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लेखन कौशल्य आवश्यक आहे. यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असे ते म्हणाले. विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील विशेष कर्तव्य अधिकारी एस. पी. सिंग यांनी मार्गदर्शन करताना प्रसारमाध्यमे समाजातील सत्य समोर आणतात, असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे म्हणाले की, भाषेचा अभ्यास करून त्यात प्राविण्य मिळवणे याला विद्यार्थ्यांचे प्रथम प्राधान्य असले पाहिजे. कारण भाषा हे अनंत शक्यतांचे द्वार आहे. भाषा कौशल्यांमध्ये प्रवीण असलेले विद्यार्थी माध्यम आणि भाषांतर यांसारख्या क्षेत्रात सामग्री लेखनात अधिक सक्षम असतात.

कार्यशाळेच्या पहिल्या तांत्रिक सत्रात पत्रकार डॉ. योगेश पांडे यांनी वृत्तलेखनाच्या कलेवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात आयकर विभागाचे राजभाषा उपसंचालक अनिल त्रिपाठी यांनी उपस्थितांना पत्रलेखनाच्या कलेचे प्रशिक्षण दिले. कार्यशाळेत विविध महाविद्यालये आणि विभागातील ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे संयोजक डॉ.लखेश्वर चंद्रवंशी यांनी कार्यशाळेचे संचालन केले तर आभार डॉ. एकादशी जैतवार यांनी मानले.



# राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग व विज्ञान संस्था यांचा संयुक्त उपक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग आणि विज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिवस गुरुवार, दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे अध्यक्षस्थानी होते तर वरिष्ठ क्रीडा पत्रकार श्री नरेश शेळके, डॉ. सी. पी. चौधरी, के.जी पाटील यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती. पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर यांनी खेळाचे महत्व तसेच प्रमुख अतिथींची ओळख करून दिली. वरिष्ठ क्रीडा पत्रकार श्री नरेश शेळके यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर, खेळावरती प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयी विविध वेगवेगळी प्रकारची माहिती सांगितली. त्याचप्रमाणे नुकत्याच झालेल्या ऑलिंपिकचे विश्लेषण केले. संचालन कुमारी सूची हिने केले तर आभार हर्षल ने मानले. बुद्धिबळ, टेबल टेनिस, एथलेटिक्सचे विविध प्रकार टग ऑफ वार असे विविध खेळ विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वृषाली देशमुख, सुनील कापगते, रोशनी खोब्रागडे, भास्कर अतकरे, जस्सी सिंग यांनी सहकार्य केले.




# भाषाबोध हेच लेखनकलेची आधारशीला
## डॉ. श्रीपाद जोशी यांचे प्रतिपादन-हिंदी विभागातील मीडिया लेखन कार्यशाळेचा समारोप

भाषाबोध हेच लेखन कलेची आधारशीला असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक तथा अखिल भारतीय मराठी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर हिंदी विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय 'मीडिया लेखन कार्यशाळेच्या समारोपीय कार्यक्रमात शनिवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी डॉ. जोशी मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षस्थान हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय मराठी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी, संपादक श्री निरज श्रीवास्तव, सहयोगी संपादक श्री चारुदत्त कहू यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. जोशी यांनी. मीडिया लेखनासाठी समाज, संस्कृती आणि भाषेचा गहन बोध असावा लागतो, असे सांगितले. भाषा शिक्षण आणि प्रशिक्षणावर गंभीरपणे विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. भाषा संस्काराचं एक महत्त्वपूर्ण भाग असून ती आपल्या व्यक्तिमत्वावर प्रभाव टाकते, असे डॉ. जोशी म्हणाले. या प्रसंगी 'पावर ऑफ वन' (मासिक) चे संपादक नीरज श्रीवास्तव यांनी ज्ञानाचे महत्त्व सांगताना, ज्ञान हा मनुष्याचा सर्वात मोठा शस्त्र आहे, असे सांगितले. ज्ञानाच्या आधारे व्यक्ती प्रत्येक आव्हानावर विजय मिळवू शकतो. त्यामुळे ज्ञान मिळवण्यासाठी मनुष्याला सतत प्रयत्नशील राहायला हवे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडेय यांनी भाषा मनुष्याला संस्कारित करते आणि भाषिक कौशल्ये आपल्या विचारशक्तीला विकसित करतात, असे सांगितले.

माध्यम लेखनात भाषेची भूमिका समजून घेतल्यास उत्तम परिणाम मिळू शकतात, असे ते म्हणाले. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी सहयोगी संपादक श्री चारूदत्त कडू यांनी स्तंभ लेखनाच्या विविध पैलूवर आणि लेखा - डाक विभागाचे राजभाषा अधिकारी तेजवीर सिंग यांनी पत्रलेखन व विज्ञापन लेखनाच्या कलेवर मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे संचालन डॉ. सुमित सिंग यांनी केले आणि आभार प्रा. जागृति सिंग यांनी मानले. सर्व सहभागी सदस्यांना अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात गुरुवार, दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी कार्यक्रम पार पडला. कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले यांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला हरपण करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार, कुलगुरू कार्यालयातील अधीक्षक सतिश साधनकर, यूडीसी श्री शैलेश राठोड, जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, सर्वश्री मनोज मोरे, नितीन खरबडे, योगेश केवटे, रुपेश आतराम, अनिल खरे, नरेंद्र पवार, कार्तिक हरडे, आसिफ शेख, कवडू भोयर यांच्यासह अन्य उपस्थित होते.






## सकारात्मक राहणे हेच जीवन - डॉ. संजय दुधे
## सेवानिवृत्त शिक्षक, कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ

सकारात्मक राहणे हेच जीवन असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शनिवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमात डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. जीवन सुंदर असून त्याकडे नकारात्मक दृष्टीने न पाहता सकारात्मक दृष्टीने पाहण्याचे आवाहन डॉ. दुधे यांनी पुढे बोलताना केले. जीवनामध्ये जीवनमूल्य सामाजिक मूल्यांना अधिक महत्त्व असल्याचे सांगत सेवानिवृत्तीनंतर भरपूर वेळ मिळणार असून आरोग्याकडे लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते जुलै व ऑगस्ट महिन्यामध्ये सेवानिवृत्त झालेले सत्कारमूर्ती विद्युत परमाणु व संगणकशास्त्र विभागातील माजी विभाग प्रमुख डॉ. सतीश जगन्नाथ शर्मा, पदव्युत्तर शिक्षण विभागातील सहाय्यक प्राध्यापक श्रीमती रेणू विजय बायस्कर, लेखा विभागातील सहाय्यक कुलसचिव श्री मनोज मनोहर जोशी, सामान्य परीक्षा विभागातील श्रीमती विजया रामकृष्ण ठाकरे, अभियांत्रिकी विभागातील अभियंता श्री नितीन वसंत विश्वकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील दप्तरी श्रीमती छाया महादेव राऊत व विद्या विभागातील श्री किशोर कृष्णाजी लोणारे यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह व धनादेश देत सत्कार करण्यातआला.कार्यक्रमाचे संचालन करीत आभार श्री दीपक घोडमारे यांनी मानले.



# जागतिक मागणीचा आधुनिक अभ्यासक्रम राबवणारा मध्य भारतातील एकमेव विभाग

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठात डिपाटमेंट ऑफ मॉलिकुलर बॉयोलॉजी ॲन्ड जेनेटिक इंजिनियरिंग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

